RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक - संजय मंगेश भैरे

वर्ष: १० अंक : ७ ■ मुंबई, मंगळवार १४ ते २० जानेवारी २०२५ | मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

**जगभरात तुतारीचा आवाज घुमवणारे आंतरराष्ट्रीय तुतारीवादक पांडुरंग गुरव यांनी रचला तुतारीवर पोवाडा**

पान २ वर

**निःस्वार्थभावे केलेली समाजसेवा हीच ईश्वरसेवा**

**-महंत गोविंददेव गिरिजी महाराज**

पान ८ वर

## पुनर्विकासाचा जीआर वैधच

## मोतीलालनगरला कायदेशीर आडकाठी नसल्याचा सरकारचा न्यायालयात दावा

■ **मुंबई**

'गोरेगावमधील तब्बल १४३ एकर क्षेत्रफळावरील मोतिलालनगरचा खासगी विकासक कंपनीमार्फत (कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सी) एकत्रित पुनर्विकास करण्याविषयी कोणतीच कायदेशीर आडकाठी नाही. शिवाय अशा पद्धतीने प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेऊन राज्य सरकारने ६ ऑक्टोबर २०२१ रोजी काढलेला शासन निर्णय (जीआर) हा न्यायालयाचा १७ ऑक्टोबर २०१३ रोजीचा आदेश किंवा विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली-२०२३च्या ३३(५) या नियमाशीही विसंगत नाही', असा दावा राज्य सरकारने सविस्तर प्रतिज्ञापत्राद्वारे मुंबई उच्च न्यायालयात केला आहे.

'यापूर्वी हा प्रकल्प स्वतःहून राबवू, असे म्हाडाने प्रतिज्ञापत्राद्वारे सन २०१३मध्ये म्हटले होते. मात्र, आता म्हाडाने घूमजाव करत खासगी विकासक कंपनीमार्फत प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे म्हाडा व सरकारची कृती अवैध आहे', असे म्हणत मोतिलालनगर १,२ व ३ या भव्य वसाहतीतील अनेक हाऊसिंग सोसायट्यांनी अर्जांद्वारे आक्षेप घेतला आहे. त्याचबरोबर मूळ जनहित याचिकाकर्त्यांनीही विरोध दर्शवला आहे. मात्र, 'त्या आदेशातील 'स्वतःहून' या शब्दाचा अर्थ याचिकाकर्ते व अर्जदार चुकीचा घेत आहेत. पूर्वीच्या नियम ३३ (५) अन्वये पुनर्विकासाच्या तरतुदींमध्ये 'विभागीय', असा शब्द होता. म्हाडा आपली स्वतःची संसाधने वापरून पुनर्विकास करेल, अशा अर्थाने तो शब्द होता. मात्र, ८ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या डीसीआर दुरुस्तीने नियम ३३(५) च्या तरतुदींमधील 'विभागीय', हा शब्द वगळण्यात आला. तशीच तरतूद नंतर २०३४च्या विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीतील नियम ३३ (५) मध्ये करण्यात आली. त्यानुसार, हा प्रकल्प म्हाडामार्फतच होणार असून तो राबवण्यासाठी खासगी विकासकाची बांधकाम व विकास संस्था म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. उच्च न्यायालयाच्या २०१३मधील आदेशातही 'स्वतःहून' या शब्दानंतर 'सुधारित ३३ (५) अन्वये', असे शब्द आलेले आहेत. त्यामुळे 'स्वतःहून' या शब्दाचा अर्थ म्हाडा स्वतःची संसाधने वापरून प्रकल्प राबवेल, असा होत नाही, अशी भूमिका सरकारने मांडली आहे.

# अमित शहांचा ठाकरे-पवारांवर हल्लाबोल



■ **शिर्डी**

भारतीय जनता पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशनाचा समारोप रविवारी शिर्डीत झाला. या समारोप समारंभास भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आले होते. सध्या शिवसेना उबाठा आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून भाजपसंदर्भात चांगली वक्तव्य केली जात आहे. त्यामुळे अनेक राजकीय पंडितांना आश्चर्य वाटत आहे. परंतु रविवारी अमित शाह यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना घेरले. त्यांच्यावर घणाघाती टीका केली. महाराष्ट्रातील जनतेच्या विश्वासघात केल्याची टीका अमित शाह यांनी केली.

अमित शाह यांनी सांगितले की, १९७८ मध्ये शरद पवार यांनी बंडखोरी केली होती. त्यांनी त्यावेळी विश्वासघात करण्याचे जे राजकारण केले होते, त्यावेळी त्यांना धडा शिकवण्याचा काम महाराष्ट्रातील जनतेने केले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनाही २०१९ मध्ये आमच्यासोबत द्रोह केला. त्यांनी विचारधारा सोडली. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले. त्या उद्धव ठाकरे यांना धडा शिकवण्याचे काम तुम्ही केले. विधानसभा निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवली. १९७८ ते २०२४ पर्यंत महाराष्ट्र जेव्हा जेव्हा अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. त्या, त्या वेळी स्थिर सरकार देण्याचे काम तुम्ही केले. हिंदुत्व आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या राजकारणास विरोध करणाऱ्यांना तुम्ही धडा शिकवला. विधानसभा निवडणुकी खरी शिवसेना खऱ्या राष्ट्रवादीला तुम्ही विजय केले. घराणेशाही राजकारण करणाऱ्यांना नाकारले.

शरद पवार यांच्यावर टीका करताना अमित शाह म्हणाले, काही दिवसांपूर्वी मी एक चित्र पाहत होते. त्या चित्रात शरद पवार महाराष्ट्रातील विविध विभागाकडे पाहत होते. त्या चित्राचा अर्थ मी शरद पवार यांना समजवतो. महायुतीला उत्तर महाराष्ट्रात २२ पैकी २१ जागा विधानसभेत मिळाल्या. कोकणात १७ मधून १६ जागा मिळाल्या. पश्चिम महाराष्ट्रात २६ मधून २४ जागा मिळाल्या. पश्चिम विदर्भात १७ पैकी १६ जागा मिळाल्या. पूर्व विदर्भात २९ पैकी २२ तर मराठवाड्यात २० पैकी १९ जागा मिळाल्या. मुंबईत १७ पैकी १५ जागांवर विजय मिळला.

शरद पवार मुख्यमंत्री राहिले, देशाचे कृषीमंत्री राहिले. परंतु राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवू शकले नाही. आता भाजप सरकार प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहचवल्याशिवाय थांबणार नाही, असे अमित शाह यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले, लोकसभेनंतर महाराष्ट्रात महायुतीचा पराभव होणार? अशी स्वप्न पाहिली जात होती. त्यांचे स्वप्न तुम्ही धुळीस मिळवली. महाराष्ट्राचा महाविजयाने देशातील राजकारणावर पटरीवर आणले गेले. या महाविजयाचे श्रेय भाजप कार्यकर्ते आणि महाराष्ट्रातील जनतेला आहे, असे अमित शाह यांनी म्हटले

### श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र त्यांना समजला नाही - फडणवीस



विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता भाजपाचं शिर्डीत महाविजय अधिवेशन पार पडत आहेत. या अधिवेशनासाठी राज्यातील भाजपाचे सर्व नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे देखील उपस्थित आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचं हे अधिवेशन महत्वाचं मानले जात आहे. या अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. 'ज्यांना श्रद्धा आणि सबुरीचा अर्थ समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे विधानसभेला आपण पाहिले', असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला.

"महाराष्ट्रामध्ये आपल्याला जो महाविजय प्राप्त झाला, त्याबद्दल आपल्या सर्वांना माझा साष्टांग दंडवत. कारण जनतेमुळे हा महाविजय मिळाला. आपल्या या लढाईमध्ये २४ तास आपल्याबरोबर अमित शाह होते. लोकसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या अपयशानंतर कार्यकर्त्यांना लक्षात येत नव्हतं की आपले काय चुकले? मात्र, अशा परिस्थितीत अमित शाह यांनी विविध ठिकाणी मेळावे घेत आपल्याला मार्गदर्शन केले, कार्यकर्त्यांच्या मनात ऊर्जा निर्माण केली. त्यानंतर भाजपाने महाविजय मिळवला.

"साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र आपल्या भाजपात महत्वाचा आहे. राष्ट्र प्रथम म्हणजे श्रद्धा आणि नंतर सबुरी म्हणजे आपण. हा मंत्र आपण सर्वजण पाळत असतो. आपल्याला माहिती आहे की ज्यांना हा मंत्र समजला ते सर्व यशस्वी झाले. पण श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांना समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे आपण विधानसभेच्या निवडणुकीत पाहिले", असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांवर टीका केली.

### तुम्हारे पांव के नीचे कोई ज़मीन नहीं...

### आशिष शेलार यांचा शेरो शायरीतून निशाणा

आशिष शेलार यांनी म्हटले की, "उद्धव ठाकरेंनी वल्गना केली होती की देवेंद्र फडणवीस राहतील किंवा मी राहील. तसेच लोकसभेच्या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी असा नडलो की त्यांना घाम फुटला. त्यांचे भाषण पाहताना कीव येते, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते. आम्ही असेच आहोत वाकड्यात गेलो की तोडून टाकतो, असेही त्यांनी म्हटले होते. एवढेच नाही तर उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांना म्हणाले होते की, एक तर तुम्ही राहताल किंवा मी राहील. मात्र, तरीही देवेंद्र फडणवीस यांनी स्वभावानुसार काहीही उत्तर दिले नाही", असे म्हणत आशिष शेलारांनी ठाकरेंवर टीका केली. आशिष शेलार यांनी असेही म्हटले की, "उद्धव ठाकरेची मी तुम्हाला आणि तुमच्या पक्षाला सांगतोय. तुम्हारे पांव के नीचे कोई ज़मीन नहीं कमाल ये है की फिर भी तुम्हें यक़ीन नहीं", अशा शेरोशायरीतून आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला.

## महाकुंभमध्ये 2 लाख कोटींच्या उलाढालीची शक्यता



■ **प्रयागराज**

जगातील सर्वांत मोठा मेळावा असलेल्या महाकुंभला सोमवारपासून पहिल्या शाही स्नानाने सुरुवात झाली आहे. पौष पौर्णिमेच्या मुहूर्तावर सुरू होणारा हा सोहळा ४५ दिवस चालेल. दर १२ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभसाठी हजारो साधू-संत आणि जगभरातील लाखो भाविक प्रयागराजमध्ये दाखल झाले आहेत. पुढील दीड महिन्यांत तब्बल ४० कोटी भाविक या मेळ्याला येतील, अशी शक्यता गृहीत धरूनच उत्तर प्रदेश सरकारने या सोहळ्याची तयारी केली आहे. श्रद्धा, व्यापार व आधुनिक व्यवस्थापन यांचा मिलाफ असलेल्या या महाकुंभामागे एक प्रचंड आर्थिक यंत्रणा कार्यरत आहे. ही यंत्रणा स्थानिक व राष्ट्रीय स्तरावर आर्थिक प्रगतीस चालना देत आहे.

योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने महाकुंभसाठी ६,९९० कोटी रुपये खर्च करून ५४९ प्रकल्प सुरू केले आहेत. याअंतर्गत विकासापासून स्वच्छतेपर्यंतची अनेक कामं चालू आहेत. २०१९ मधील कुंभमेळ्याशी तुलना केल्यास त्यावेळी ३,७०० कोटी रुपये खर्च करून ७०० प्रकल्प हाती घेण्यात आले होते.

महाकुंभ मेळ्याच्या आयोजनाशी संबंधित अधिकाऱ्यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार या सोहळ्याद्वारे उत्तर प्रदेश सरकारला २५ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणार असून राज्याच्या अर्थव्यवस्थेत २ लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल. महाकुंभ २०२५ च्या माध्यमातून उत्तर प्रदेशच्या विकासासाठी, आर्थिक वाढीसाठी २ लाख कोटी रुपयांपर्यंतचं उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. या सोहळ्यासाठी ४० कोटी लोक येतील. या लोकांनी सरासरी ५,००० रुपये जरी खर्च केले तरी त्यातून दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल.

केवळ श्रद्धा नव्हे तर कुंभ हा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा उत्सव ठरला आहे. ४० दिवस चालणारा हा मेळा लाखो लोकांना रोजगाराची संधी देतो आणि व्यापाराच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकट करतो. महाकुंभ हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. लाखो भाविक व हजारो व्यावसायिकांच्या सहभागामुळे महाकुंभ जागतिक स्तरावर महत्त्वाचा उत्सव ठरतो. श्रद्धा, व्यापार आणि आधुनिक व्यवस्थापनाचा हा संगम भारताच्या आर्थिक आणि सांस्कृतिक महत्त्वाला अधोरेखित करतो. महाकुंभ हा श्रद्धेइतकाच आर्थिकदृष्ट्याही भारताचा वारसा आहे. या ठिकाणी धार्मिकता आणि आधुनिकतेचा संगम पाहायला मिळतो. स्थानिकांपासून जागतिक ब्रँड्सपर्यंत, सर्वांसाठी संधीचा मेळ हा कुंभ आहे.

### पालिका रुग्णालयांचा औषध पुरवठा ठप्प

### 120 कोटी थकीत रकमेचा ठपका

■ **मुंबई**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) २७ रुग्णालयांमध्ये औषध पुरवठा करणाऱ्या ऑल फूड अँड ड्रग लायसन्स होल्डर्स फाउंडेशनने १३ जानेवारीपासून औषध पुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या चार वर्षांत पालिकेकडून १२० कोटी रुपयांची थकबाकी देण्यात आलेली नाही, यामुळे हा कठोर निर्णय घेण्यात आल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष अभय पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पालिकेच्या मध्यवर्ती खरेदी विभागाकडून निविदा प्रक्रिया किंवा दर करारांचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे रुग्णालये स्थानिक खरेदी आणि जुन्या करारांवर अवलंबून आहेत. यामुळे सार्वजनिक निधीचा मोठा अपव्यय होत असल्याचा आरोप पांडे यांनी केला. औषध पुरवठा थांबल्याने रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून रुग्णसेवा ठप्प होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

पालिकेचे आयुक्त यांनी या गंभीर परिस्थितीवर उपाययोजना करण्याचे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त विपिन शर्मा यांना दिले आहेत. मात्र, फाउंडेशनने मागण्या पूर्ण होईपर्यंत औषध पुरवठा थांबवण्याचा निर्णय कायम ठेवण्याचा इशारा दिला आहे.

पालिकेच्या विलंबामुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे रुग्णांना होणारा त्रास आणि सार्वजनिक आरोग्यसेवेवर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेता, प्रशासनाने त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असल्याचे मत आरोग्य तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## पृथ्वीराज चव्हाण काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी?

■ **मुंबई**



माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाण्याची शक्यता आहे. राज्यात काँग्रेसला पुन्हा संघटित करण्यासाठी पक्षश्रेष्ठी विचारमंथन करत असून चव्हाण यांच्या नावाची चर्चा जोर धरू लागली आहे.

सध्याच्या राजकीय परिस्थितीत काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात मजबूत नेतृत्वाची गरज असल्याचे नेत्यांचे मत आहे. पृथ्वीराज चव्हाण हे अनुभवी राजकारणी असून राज्यातील काँग्रेसच्या संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी त्यांच्या नावावर सहमती होण्याची शक्यता आहे. चव्हाण यांनी यापूर्वी मुख्यमंत्रीपदाचा कारभार यशस्वीपणे सांभाळला असून त्यांची प्रशासनिक आणि संघटन कौशल्ये त्यांना या पदासाठी योग्य उमेदवार बनवतात.

या पार्श्वभूमीवर, काँग्रेसच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा सुरू आहे. राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीसाठी संघटनेला मजबूत करण्याचे आव्हान पक्षासमोर आहे. त्यामुळे अनुभवी नेतृत्वाला संधी दिली जाणार असल्याचे मानले जात आहे.

चव्हाण यांच्या नावाला अंतिम मंजुरी मिळाल्यास, त्यांच्यासमोर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी काँग्रेसला प्रभावीपणे तयार करण्याचे मोठे आव्हान असेल. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला नवा संजीवनी मिळेल, अशी पक्षाकडून अपेक्षा आहे.

तथापि, अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसून, पक्षांतर्गत चर्चा आणि सहमतीनंतरच अंतिम निर्णय जाहीर होईल.

### 19 जानेवारीला भुयारी मेट्रो स्थानकाचे प्रवेशद्वार बंद राहणार

■ **मुंबई**

आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यातील भुयारी मेट्रोच्या विमानतळ टी २ स्थानकाचे प्रवेशद्वार देखभालीसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याने १९ जानेवारीला प्रवाशांना ए २ या प्रवेशद्वाराचा वापर करता येणार नाही. भुयारी मेट्रो मार्गिकेच्या स्थानकांना विविध ठिकाणी प्रवेशद्वारे बांधण्यात आली आहेत. विमानतळ टी २ या मेट्रो स्थानकाचे पूर्वेकडील बी १ हे प्रवेशद्वार रविवारी बंद ठेवण्यात आले होते. पश्चिम दिशेकडील ए २ हे प्रवेशद्वार १९ जानेवारीला बंद ठेवण्यात येणार आहे. या दिवशी प्रवेशद्वाराच्या देखभालीचे काम करण्यात येणार असल्याने प्रवाशांना येथून ये-जा करता येणार नाही. इतर प्रवेशद्वारे मात्र नेहमीप्रमाणे खुली असतील.

## गनिमी काव्याने पाण्याच्या टाकीवर चढत धनंजय देशमुखांचे आंदोलन

■ **बीड**



बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला एक महिना पूर्ण होऊनही पोलिस तपासाची माहितीच देत नसल्याचा गंभीर आरोप करताना सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी आज गावच्या पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले आणि न्यायासाठी आक्रोश केला. यावेळी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. आंदोलनामध्ये गावच्या महिलांनी सुद्धा उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या.

आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनी मुख्य आरोपी अजूनही मोकाट कसा? त्याला का 302 च्या कलमाखाली अटक करण्यात आली नाही? असा संताप व्यक्त करत सवाल उपस्थित केला. यावेळी जमलेल्या महिलांनी पोलीस प्रशासनाविरोधात आक्रोश व्यक्त करताना बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यावर बांगड्या सुद्धा फेकल्या. संतप्त महिलांनी संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणामध्ये पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप केला. एसपींवर संताप व्यक्त करत बांगड्या भेट देण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, धनंजय देशमुख यांनी गनिमी काव्याने पाण्याची टाकीवर चढत आंदोलन केले. आंदोलनाला गावकरीही उपस्थित होते. बीड पोलीस प्रशासन आणि मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील हे सुद्धा आंदोलनस्थळी होते. त्यांनी दोन तासांपासून धनंजय देशमुख यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न करत टाकीवरून खाली उतरण्याचा सल्ला दिला. मात्र, धनंजय देशमुख यांनी पाण्याची टाकीवर गेल्यानंतर एक शिडी काढून ठेवल्याने त्यांच्यापर्यंत पोलिसांना पोहोचणे शक्य नव्हतं. त्यामुळे पोलिसांकडून अग्निशमन दलाच्या गाडीला पाचरण करण्यात आले. दोन तासांच्या मनोज जहांगे पाटील यांच्या विनवणीनंतर धनंजय देशमुख टाकीवरून खाली उतरले.

**एसपींशी बोलण्यास थेट नकार**

आंदोलनामध्ये संतोष देशमुख यांची कन्या वैभवीने सुद्धा पाण्याच्या टाकीवर चढत आंदोलन केलं. वैभवीला सुद्धा खाली उतरवण्यात आले.यावेळी बोलताना धनंजय देशमुख यांनी एसपींशी बोलण्यास थेट नकार दिला. मनोज जरांगे पाटील यांनी त्यांना विनवणी करत आपण सोबतच आहोत दिवसभरात ज्यांच्याशी बोलायचं आहे त्यांच्याशी बोलणं करून घेऊ, मात्र आपण खाली उतरा असे आवाहन केले. दोन तासांच्या विनवणीनंतर धनंजय देशमुख खाली उतरले.

### वैभवी देशमुखचे प्रशासनाला सवाल

संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने प्रशासनाला संतप्त सवाल केलाय . माझ्या वडिलांना तर रस्त्यावरून उचलून नेलं .आता काकाला काही झालं तर कोण जबाबदार ? प्रशासन नक्की करतंय काय ? आज माझे पप्पा गेले . काकाला गमावलं तर आम्ही काय करायचं .आज जसा काका वर गेलाय, आरोपींना अटक झाली नाही तर आमचं संपूर्ण कुटुंब टाकीवर जाईल .आमचा एक माणूस गेलाय तर प्रशासन आरोपींना पकडत नाही . ज्यावेळी कुटुंबातील सगळे जातील तेव्हाच हे आरोपींना पकडतील का? अशी आक्रमक भूमिका संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुखने घेतली आहे . आम्ही काकाशी बोललो नाहीत पण तो गेल्या चार दिवसांपासून प्रचंड तणावाखाली आहे . प्रशासनाला तो एकच सवाल करतोय,जे तुमचं चाललंय ते आम्हाला कळवा .फक्त आम्हालाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राला कळलं पाहिजे. नुसतच पोलीस प्रशासन येताय उभे राहतंय नक्की प्रक्रिया काय चालली आहे हे अद्यापही आम्हाला माहित नाही .आम्ही टोकाचं काही केल्यावर यांच्या डोळे उघडणार आहेत का असा सवाल ही तिने प्रशासनाला केलाय .

## लोखंडी सळ्या घेऊन जाणाऱ्या आयशरला टेम्पोची धडक, आठ जण ठार

■ **नाशिक**

धार्मिक कार्यक्रम आटोपून नाशिककडे घरी परतणाऱ्या छोटा हत्ती टेम्पोने (क्रमांक एम.एच. 15 एफव्ही 5601) लोखंडी सळया (गज) घेऊन जाणाऱ्या आयशर ट्रकला ( क्रमांक एम.एच. 25 यू 0508) पाठीमागून जोरदार धडक दिल्याने टेम्पोमधील आठ जण ठार झाले. मृतांमध्ये पिता पुत्राचा देखील समावेश आहे. अन्य चौदाजण जखमी झाल्याची घटना घडली. मृत आणि जखमी हे नाशिकच्या सह्याद्रीनगर, सिडको आणि पाथर्डी फाटा येथील रहिवासी आहेत.

निफाड तालुक्यातील वनगाव (धारणगाव वीर) येथून धार्मिक कार्यक्रम आटोपून नाशिककडे यायला टेंपो निघाला होता. द्वारका परिसरात उड्डाणपुलावरून जात असताना हा अपघात घडला. पुढे चालत असलेल्या आयशर ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या नादात हा टेम्पो पाठीमागून ट्रॅकवर धडकला. लोखंडी सळया घेऊन हा ट्रक चालला होता. टेम्पो पाठीमागून ट्रकवर धडकल्याने टेम्पोतील तरुणांच्या डोक्यात, अंगातच सळया घुसल्या. या अपघातात अतुल मंडलिक, चेतन पवार, दर्शन घरत, यश खरात आणि संतोष मंडलिक यांचा जागीच मृत्यू झाला. अन्य तिघांचा रूग्णालयात मृत्यू झाला. जखमींमध्ये प्रेम मोरे, सार्थक ऊर्फ लकी सोनवणे, राहुल साबळे, लोकेश, विद्यानंद कांबळे, समीर गवई, अरमान खान, अनुज घरटे, साई काळे, मकरंद आहेर, कृष्णा भगत, शुभम डांगरे, अभिषेक आदींचा समावेश आहे. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## किरकोळ महागाई चार महिन्यांच्या नीचांकी पातळीवर

■ **नवी दिल्ली**

डिसेंबरमध्ये देशातील किरकोळ महागाई दर 5.22 टक्क्यांच्या चार महिन्यांतील नीचांकी पातळीवर आला आहे. नोव्हेंबरमध्ये हा दर 5.48 टक्के होता. खाद्यपदार्थांच्या किमती कमी झाल्यामुळे ही घसरण झाली आहे. सरकारने सोमवारी याबाबतची आकडेवारी जाहीर केली.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (NSO) अंतर्गत ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) आकडेवारीनुसार, डिसेंबरमध्ये अन्नधान्य महागाई 8.39 टक्के होती. नोव्हेंबरमध्ये ते 9.04 टक्के आणि डिसेंबर 2023 मध्ये 9.53 टक्के होते. NSO च्या मते, डिसेंबरमध्ये ग्राहक किंमत निर्देशांक (सामान्य) आणि अन्नधान्य महागाई दोन्ही गेल्या चार महिन्यांतील नीचांकी पातळीवर होते.

गेल्या महिन्यात, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने चालू आर्थिक वर्ष 2024-25 साठी महागाईचा अंदाज 4.5 टक्क्यांवरून 4.8 टक्क्यांपर्यंत वाढवला होता. ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत अन्नधान्याच्या किमतींवरील दबावामुळे एकूण चलनवाढीचा दर उच्च राहण्याची अपेक्षा मध्यवर्ती बँकेने केली आहे.

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित एकूण चलनवाढ जुलै-ऑगस्ट दरम्यान सरासरी 3.6 टक्क्यांवरून सप्टेंबरमध्ये 5.5 टक्के आणि ऑक्टोबर 2024 मध्ये 6.2 टक्के झाली.

## जातीनिहाय जनगणना करा नाहीतर आम्हाला 51% घोषित करा -भुजबळ

■ **धाराशिव**

राज्यात महायुतीची सत्ता आली. मात्र राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर छगन भुजबळांनी जाहीर नाराजी व्यक्त केलीय. आता छगन भुजबळ यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद ॲक्टिव्ह झाल्याचं पहायला मिळत आहे. मराठवाड्यात गाव तिथे समता परिषदेची शाखा आणि घर तिथं समता सैनिक ही मोहीम समता परिषदेकडून राबविण्यात येत आहे. धाराशिव येथे समता परिषदेची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत परिषदेचे राज्य उपाध्यक्ष सुभाष राऊत यांनी पुढील रणनीती पदाधिकाऱ्यांना सांगितली. धाराशिव जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात 100 शाखांचे उद्घाटन करण्याचं यावेळी ठरवण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढण्याची तयारी छगन भुजबळांची समता परिषदेकडून सुरू असल्याचे चित्र आहे.

जातीनिहाय जनगणनेची मागणी आम्ही अनेक वर्षांपासून करत आहोत. मात्र आमची वेळोवेळी फसवणूक झालेली आहे. मराठा आरक्षणाला माझा विरोध नाही. मात्र ते आमच्यात आले तर आम्हालाही काही मिळणार नाही आणि त्यांनाही काही नाही. त्यामुळे जातीनिहाय जनगणना करा नाहीतर आम्हाला 51% घोषित करा. अशी मागणी आज शेगाव येथील माळी समाजाच्या मेळाव्यात केली. यावेळी त्यांनी मनोज जरांगे यांच्यावरही टीका केली.




छगन भुजबळ म्हणाले की, "अशा कार्यक्रला जाणे मी टाळतो. कारण समाज एक असला तरी पक्ष वेगळे असतात, विचारसरणी वेगळी असते. मी ओबीसींच्या प्रश्नावर शिवसेना सोडली. मी नरसिंह राव यांच्याकडे गेलो. त्यावेळी नरसिंह राव यांनी ओबीसी समाजाची सेवा करण्याचा सल्ला दिला होता. त्यातूनच समता परिषद स्थापन झाली. आदिवासी, दलित, ओपन आणि ओबीसी या चार वर्गात बाबासाहेबांनी समाजाला बांधलं. व्ही पी सिंहानी नंतर मंडळ आयोगासाठी काम केलं. त्यानंतर आपल्याला 30 टक्के आरक्षण मिळालं."

## पंकजा मुंडेंच्या टीकेवर सुप्रिया सुळेंचा पलटवार

■ **मुंबई**



गुन्हेगारीच्या घटना विविध जिल्ह्यांमध्ये घडत असून अशा घटना थांबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या घटनांवर राजकारण होता कामा नये. मात्र परळी, बीडलाच बदनाम केले जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया भाजपा आमदार पंकजा मुंडे यांनी काल दिली होती. त्यांच्या या प्रतिक्रियेवर आता राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. त्या बुलढाण्यात पत्रकारांशी बोलत होत्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, "परभणी आणि बीड या दोन्ही घटना माणुसकीला काळिमा फासणाऱ्या आहेत. राष्ट्रवादीचे खासदार बजरंग सोनावणे यांनी संसदेत पहिल्यांदा महाराष्ट्राच्या वतीने परभणी आणि बीडप्रकरणी आवाज उठवला. संदीप क्षीरसागर, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, मुंदडा, अजित पवारांचे आमदार सोळंके यांनी विधानभवनात हा मुद्दा मांडला. ही अत्यंत क्रूर आणि गलिच्छ घटना झाली आहे. यात राजकारण आणू नये. माणुसकीच्या नात्याने परभणीला न्याय देण्याची मागणी करतेय. या संघर्षाच्या आणि अडचणीच्या काळात ३३ दिवसांनंतरही अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. सातत्याने प्रश्न मांडले जात आहेत, त्याचे उत्तर येत नाही. अजूनही एक खुनी फरार आहे. वाल्मिक कराडला ईडीची नोटीस आली तरीही कारवाई झाली नाही. त्याच्यावर मकोकाही लावण्यात आला नाही. तो अटकेत आहे, पण त्याची अटक कशी झाली? तो शरण आला. ही चेष्टा लावली आहे का?"

## हात जोडून विनंती करतो, उद्धव ठाकरेंची साथ सोडू नका- चंद्रकांत खैरे

■ **छत्रपती संभाजीनगर**

विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसल्यानंतर आता महाविकास आघाडीत बिघाडीची शक्यता निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. याचे कारण म्हणजे गेल्या काही दिवसांत महाविकास आघाडीतील नेते एकमेकांच्या विरोधात टीका-टिप्पणी करत असल्याचे पाहायला मिळत आहे. यातच खासदार संजय राऊत यांनी शनिवारी मोठी घोषणा केली. शिवसेना ठाकरे गट आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडल्याची चर्चा रंगली आहे.



दरम्यान, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून ठिकठिकाणी मेळावे आणि बैठका घेण्यात येत आहे. तसेच कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या कामाला लागण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. मात्र, ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाला मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथे मोठे धक्के बसत आहेत. गेल्या काही दिवसांत अनेक माजी नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी ठाकरे गटाला सोडून जाणाऱ्या कार्यकर्त्यांना भावनिक साद घालत उद्धव ठाकरेंची साथ सोडू नका, असे म्हणत हात जोडून विनंती करत व्यासपीठावरच कार्यकर्त्यांना दंडवत घातलं.

**कार्यकर्त्यांना घातले दंडवत**

"शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात आपल्याला आगामी महापालिकेच्या निवडणुका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका लढवणार आहोत. मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो. तुम्हाला येथे दंडवत घालतो. उद्धव ठाकरे यांच्याकडे आपल्याला पहायचं आहे. आता परवाच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे किती कळकळून बोलले. त्यामुळे मी तुम्हाला विनंती करतो की, कुठेही सोडून जाऊ नका. आपण सर्वजण एकत्र मिळून अधिकचांगले काम करू. समजा माझं काही चुकलं तर मला तुम्ही बोलले तरी काही हरकत नाही. पण माझी विनंती आहे की तुम्ही थांबा कुठेही जाऊ नका", असे म्हणत चंद्रकांत खैरे यांनी व्यासपीठावर कार्यकर्त्यांना दंडवत घातले.

# जगभरात तुतरीचा आवाज घुमवणारे आंतरराष्ट्रीय तुतारीवादक पांडुरंग गुरव यांनी रचला तुतारीवर पोवाडा

रमेश औताडे
मुंबई

' एक तुतारी द्या मज आणुनी.... फुंकिन जी मी स्वप्राणाने... भेदून टाकीन सगळी गगणे.... दीर्घ तिच्या त्या किंकाळीने....अशी तुतारी द्या मज आणुनी. ही कविवर्य केशवसुतांची कविता ऐकली की प्रत्येकाला आयुष्यात एकदा तरी तुतारी वाजवण्याचा मोह निर्माण होतो.




अशा या तुतरीचा स्वर अमेरिका, मॉरिशस ,जपान,दुबई या व इतर देशात पोहचवला ते सांगली जिल्ह्यातील वाटेगावचे पांडुरंग शंकर गुरव आज महाराष्ट्रात अनेक महाविद्यालयात विविध सण समारंभ मध्ये पुरातन काळापासून चालत आलेली तुतारी ची कला जिवंत राहावी म्हणून जनजागृती करत आहेत. आंतरराष्ट्रिय स्तरावरील तुतारी वादक पांडुरंग गुरव यांनी आता तुतरिवर पोवाडा रचला आहे.

सांताक्रुज येथील पाठक गाला महाविद्यालयात २०१५ पासून गुरव हे विद्यार्थ्यांना तुतरीची कला शिकवत आहेत. प्रत्येक वर्षी ३० ते ४० मुलांची तुकडी ही तुतारी कला शिकत असतात . महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मिता पठाडे, प्राध्यापक नेत्रा ठाकरे, प्रशांत कोकणे,दादासो म्हस्के हे सर्व या कलेमध्ये मध्ये जीव ओतून ही कला जपण्यासाठी प्रयत्न करत आहेत.गुरव यांच्या मार्गदर्शन व विद्यार्थ्यांची आवड पाहता इतर महाविद्यालयात तुतारी नक्कीच घुमणार आहे.

वयाच्या ११ व्या वर्षापासुन पांडुरंग गुरव तुतारी वाजवत तर आहेतच सोबत ते लेझीम,शंख,दांडपट्टा,तलवारबाजी या कला ही जोपासत आहेत. लहान वयात वडिलांकडून ही कला शिकत असताना मंदिर,पालखी आदी ठिकाणी ही कला सादर करत करत आज अमेरिका,मॉरिशस, जपान,दुबई या देशात त्यांना आमंत्रण येऊ लागली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांनी हे जगाचे दौरे केले आहेत.

परदेशातील राष्ट्राध्यक्ष,मंत्री ,राज्यपाल यांनी गुरव यांचा सन्मान केला आहे. सन्मान करत असताना गुरव यांच्या डोळयातून आनंद अश्रू वाहत होते .एका खेडेगावातील मुलगा कलेची परंपरा जपत महाराष्ट्राचे हे वाद्य जगभरात पोहचवत आहे. भगवान शंकर यांचे शिष्य तुंगी यांनी बैलाच्या शिंगा पासून बनविलेले हे वाद्य सर्व प्रथम वाजवले गेले होते. शिंगापासून बनले असल्यामुळे त्याला शिंग असे नाव पडले.

चला हवा येऊद्या,झी युवा,इंटरनॅशनल वर्ड ट्रेंड फेस्टिवल,नेव्ही प्रोग्राम या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात गुरव यांची तुतारी घुमली तेव्हा प्रेक्षक खूप वेळ टाळयांचा गजर करत होते. मर्द मराठे मावळे रणांगणात तुतारी वाजले की मनगटात सर्व शक्ती एकत्र करून शत्रूवर वार करताना मावळयांना एक जोश यायचा. विविध राज्यात या शिंगाला विविध नावे आहेत. तुरी ,निपुडी आदी नावाने तुतारी ओळखली जाते.

तुतारी व शंख वाजविल्याने हार्ट अटॅक येत नाही. फुफ्फुसे निरोगी राहतात असे डॉक्टर सांगतात. अनेक महाविद्यालयात विद्यार्थी याचा अनुभव घेत आहेत. अशी ही तुतारी आरोग्यदायी आहे. तिला जतन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची गरज आहे.

मी जिवंत असेपर्यंत ही कला जगभर सर्व देशात पोहोचवणार आहे. सरकारने या कलेला लोककला दर्जा द्यावा अशी मागणी गुरव करत आहेत. लोककला दर्जा तुतारीला मिळाला तर ही कला फार झपाट्याने जगभर पोहचू शकते. आज जगभरात महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात तुतारी वादक आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर फक्त मी एकटा वादक आहे. माझा यात मोठेपणा असून आंतरराष्ट्रीय तुतारी वादक अजून मोठ्या संख्येने घडविण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. असे पांडुरंग शंकर गुरव यांनी सांगितले.



# आता महाराष्ट्र थांबणार नाही... महविजयी प्रदेश अधिवेशनात साईबाबांच्या पावन नगरीत भाजपचा निर्धार

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा अधिवेशनात सहभाग

शिर्डी


श्री साईबाबांची पावन नगरी शिर्डी येथे आयोजित "भाजपा महाविजयी प्रदेश अधिवेशन २०२५" केंद्रीय गृह तथा सहकारमंत्री मा.श्री अमितभाई शाह जी तसेच राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. विधानसभेच्या ऐतिहासिक विजयानंतर हे पक्षाचे पहिलेच राज्यव्यापी अधिवेशन होते. भाजपाच्या प्रमुख नेत्यांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले भाजपाचे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांसमवेत अधिवेशनास उपस्थित राहिलो.

भारतीय जनता पार्टी तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांचे मोलाचे योगदान आहे. राजकीय आणि सामाजिक जीवनात काम करत असताना थोरा मोठ्यांचे मार्गदर्शन लाभणे हीच एका कार्यकर्त्याची इच्छा असते. माननीय अमितजींच्या मार्गदर्शनाने कार्यकर्त्यांना काम करण्यास नवी उमेद मिळाली. तसेच राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात पक्ष भविष्यात अधिक गतीने वाटचाल करेल असा विश्वास आहे.

# भारतातील पहिली संकल्पना गाडगेबाबांच्या धर्मशाळेत

रमेश औताडे
मुंबई

ज्या गोरगरीब रुग्णांना मुंबईत येऊन उपचार घेण्याची वेळ येत होती त्यांच्या नातेवाईकांची राहण्याची सोय त्या वेळी श्री संत गाडगे महाराजांनी ओळखून जी धर्मशाळा उभी केली त्या धर्मशाळा वास्तूचे आता लवकरच नऊ मजल्यात रूपांतर होणार असून रुग्णवाहिका घेऊन आलेल्या चालकांच्या राहण्याची सोय इथे केली जाणार आहे. भारतातील हि पहिली संकल्पना असणार आहे. अशी माहिती श्री संत गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट चे प्रमुख विश्वस्त हेमंत सुधाकर सामंत यांनी दिली.



मुंबईतील परळच्या केईएम रुग्णालयासमोर असणारी ही धर्मशाळा आता ४५ रूम असणारी नवीन इमारत होणार आहे. त्याच्या बेसमेंटला रुग्णवाहिका पार्किंग करण्याची जागा ठेवली जाणार आहे. शिवाय रुग्णवाहिका घेऊन आलेल्या चालकाच्या राहण्याची सोय केली जाईल. या धर्मशाळेत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ५० रुपयांत राहण्याची सोय उपलब्ध होते. दोन वेळचे शिजवलेले अन्नदेखील मिळते.

झोपण्यासाठी अंथरुण, पांघरूण आणि खाटदेखील दिली जाते. जेवण बनवण्यासाठी स्वयंपाकघराची सुविधा देण्यात आली आहे. ही सर्व सुविधा फक्त ५० रुपयांत दिली जात असल्याने रुग्ण आणि त्यांच्यासोबत आलेल्या नातेवाइकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसते. २८ फेब्रुवारी १९९३ रोजी या धर्मशाळेचे भूमिपूजन झाले. सात वर्षांनी इमारतरूपी ही धर्मशाळा उभी झाली. या संस्थेचे कार्यक्षेत्र रुग्णांच्या नातेवाइकांच्या राहण्याच्या सोयीवर लक्ष केंद्रित असूनही त्यांना भोजन देणे, दूध आणि फळे देणे, महाग औषधे असतील तर त्यासाठी काही दात्यांचा शोध घेणे, वैद्यकीय शिबिरे भरवणे, भुकेलेल्यांना अन्नदान करणे अशा अनेक उपक्रमांतून धर्मशाळेचा अखंड प्रवास सुरू आहे. परळ येथील संत गाडगे महाराज धर्मशाळेत दिवसाला १०० लोक राहण्याची सोय आहे. या धर्मशाळेत १६ रूम असून, वर्षाला जवळपास साडेतीन हजार रुग्णांची सोय केली जाते.

कर्करोगग्रस्त लहान मुलांना अनेक महिने इथेच राहावे लागते. त्यांचे आई-वडील अनेकदा त्यांना पदपथावर झोपवतात. केईएम, वाडिया आणि टाटा या तीन महत्त्वाच्या रुग्णालयांतील रुग्णांसाठी ही धर्मशाळा खरंच आधार बनली आहे. मुलांना मनोरंजन म्हणून टीव्हीचीदेखील सोय आहे. या वास्तूची निर्मिती गुणवंतराव चराटे यांनी केली. स्वच्छतेवर भर देत आजही पंढरपूरच्या दिंडीत जवळपास ४०० ते ५०० स्वच्छता कर्मचारी सहभागी होतात. तिथला संपूर्ण परिसर स्वच्छ करतात, असेही सामंत यांनी सांगितले.

# एवढ्या वेगाने रंग बदलणारे पाहिले नाहीत...

## उपमुख्यमंत्री शिंदेंचा नाव न घेता उद्धव ठाकरेंना टोला

प्रतिनिधी
मुंबई

महायुती सत्तेत असताना आणि मी मुख्यमंत्री असताना, माझ्यावर खालच्या भाषेत टीका केली जात होती. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना त्यांना तुरुंगात टाकायचा प्रयत्न झाला, तेव्हा त्यांच्यावरही अत्यंत वाईट भाषेत टीका झाली. आणि आता आपण काय बदल होतायत ते पाहतो आहोत. एवढ्या वेगाने रंग बदलणारे आपण पाहिले नाहीत, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचे नाव न घेता केली. वरळीतील एका कार्यक्रमात ते बोलत होते.



मुरली देवरा यांच्या जयंतीनिमित्त राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनी वरळीत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमाला उपस्थित होते. तेव्हा त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. आज कोणत्या लोकांना राजकीय चष्म्याची गरज आहे, हे तुम्हाला देखील माहीत आहे. त्यांनादेखील चष्मे देऊ अशी टिप्पणी त्यांनी केली.-

**मी मुख्यमंत्री असताना मला रोज शिव्यांचा प्रसाद**

*अडीच वर्षे महायुतीचे सरकार असताना, मी मुख्यमंत्री असताना मला दररोज शिव्या-शाप दिले, देवेंद्रजी उपमुख्यमंत्री असताना त्यांना तुरुंगात घालायचे कारस्थान केले. आणि आज आपण पाहतोय काय जादू झाली आहे ते. सरडे रंग बदलतात, पण एवढ्या फास्ट रंग बदलणारे आपण पाहिले नसल्याची टीका त्यांनी केली. शिवसेनेच्या वैद्यकीय कक्षाकडून अनेक वैद्यकीय उपक्रम राबवले जातात, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशनकडूनही अनेक असे उपक्रम राबवले जात असल्याचे सांगतानाच शिवसेना केवळ निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून काम करत नसल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेनेचं काम वर्षभर सुरू असतं, असा टोला देखील त्यांनी लगावला.*

महाविकास आघाडीत बिघाडीची चिन्हे दिसत आहेत, असे विचारले असता उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मविआतील सगळे घटकपक्ष हे स्वार्थासाठी एकत्र आले होते. लोकसभेच्या निवडणुकीत लोकांची दिशाभूल करून, फेक नरेटिव्ह पसरवून मतं मिळवली. आणि निवडून आल्यानंतर त्यांनी मतदारांच्याच पाठीत खंजीर खुपसला. मग, विधानसभेला मतदारांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली, अशी टीकाही त्यांनी केली.

# सरकार कराडला वाचवण्याचे काम करतंय? मुख्य आकाला सोडून खालच्या लोकांवर कारवाई केली जातेय - संजय राऊत

प्रतिनिधी
मुंबई

संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वारंवार म्हणतात की मी कुणाला सोडणार नाही. पण त्यांनी मुख्य आरोपीला मकोकातून बाहेर ठेवले आहे, असा घणाघात ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.



संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, सरकार वाल्मीक कराड याला वाचवण्याचे काम करत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला आहे. तर इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडी तुटली असे मी म्हणालो नाही. काँग्रेसच्या नेत्यांना ऐकण्याची सवय करून घ्यायला हवी, असा टोला ही त्यांनी यावेळी लगावला आहे.

संजय राऊत म्हणाले की, कोण कुठे जाणार आणि कुठे येणार हे आमचे मित्र देवेंद्र फडणवीस ठरवू शकत नाहीत. प्रत्येक पक्षाची स्वतःची भूमिका असते. विचारधाराही आहे. भाजपच्या कोणत्या विचारसरणीत पक्ष फोडणे योग्य आहे, हे फडणवीसांनी आधी स्पष्ट करावे.भाजपने आमचा पक्ष फोडला.

**मविआ तुटली असे म्हटले नाही**

संजय राऊत म्हणाले की, इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडी तुटली असे मी कधीही म्हणालो नाही. केवळ आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावना मांडल्या. त्यामुळे कुणालाही मिरच्या लागण्याचे कारण नाही. आपल्या पक्षाचा विस्तार करण्याचा अधिकार सर्वांना आहे. शिवसेनेचे मशाल चिन्ह हे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहे. अद्यापही लोकांमध्ये संभ्रम आहे. त्यामुळे ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका या निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी उपलब्ध होत असते. अशीच सर्व राजकीय पक्षांची धारणा आहे.

संजय राऊत म्हणाले की, लोकसभेला साडे चार वर्षांचा कालावधी आहे. विधानसभेला पाच वर्ष आहेत. या काळात पक्ष संघटना मजबूत करणे आणि कार्यकर्त्यांना ताकद देण्याचे काम केले पाहीजे. महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांना आता बुथ स्तरावर काम करण्याची गरज आहे. महाविकास आघाडी विधानसभेसाठी होती. स्थानिक स्वराज संस्थेसाठी ही आघाडी नव्हती. आम्ही भाजपामध्ये असतानाही स्थानिक स्वराज संस्था स्वबळावर लढत होतो.

# राष्ट्रवादीच्या मंत्र्यांचा जनता संवाद उपक्रम

## आठवड्यातील तीन दिवस मंत्री पक्षाच्या मुख्यालयात

प्रतिनिधी
मुंबई

विधानसभा निवडणुकीतील यशानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) जनाधार वाढवण्यावर भर दिला असून त्यासाठी जनता संवाद उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पक्षाचे मंत्री आठवड्यातून तीन दिवस प्रदेश कार्यालयात उपस्थित राहून पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेशी संवाद साधून त्यांचे प्रश्न सोडवणार आहेत.

मंत्रालयासमोरील ‘राजगड’ या पक्षाच्या प्रदेश कार्यालयात राष्ट्रवादीचे मंत्री मंगळवार ते गुरुवार असे उपस्थित राहणार आहेत. प्रत्येक मंत्र्यांना दिवस आणि वेळ नेमून दिली आहे. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ हे मंगळवार ते गुरुवार असे आठवड्यातील तीन दिवस सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जनतेला भेटतील. प्रत्येक मंगळवारी अन्न आणि नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे तसेच युवक, क्रीडा कल्याण आणि अल्पसंख्याक विकासमंत्री दत्तात्रय भरणे त्याचबरोबर मदत आणि पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील हे प्रदेश कार्यालयात उपस्थित राहणार आहेत.

बुधवारी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ आणि महिला व बालविकास आदिती तटकरे तर गुरुवारी राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे पक्ष कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांना भेटून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत.

# वर्षभरात अटल सेतूवरुन धावली 82 लाख 81 हजार वाहने

## सेतू वाहतूक सेवेत दाखल होऊन एक वर्षे पूर्ण

प्रतिनिधी
मुंबई

मुंबई ते नवी मुंबई प्रवास केवळ १२ ते १५ मिनिटांत करणे अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतूमुळे शक्य झाले आहे. हा सेतू वाहतूक सेवेत दाखल होऊन आज एक वर्षे पूर्ण झाले. मात्र या सागरी सेतूला अद्यापही वाहनचालक-प्रवाशांचा म्हणावा तसा प्रतिसाद मिळताना दिसत नाही. वर्षभरात अटल सेतूवरुन ८२ लाख ८१ हजार ५२४ वाहने धावली आहेत. दिवसाला ७० हजार वाहने या सागरी सेतूवरुन धावणे अपेक्षित असताना वर्षभरात दिवसाला सरासरी २२५०० वाहनांनी अटल सेतूवरून प्रवास केला आहे.

एमएमआरडीएकडून २१.८ किमीचा शिवडी ते न्हावाशेवा सागरी सेतू बांधण्यात आला आहे. मुंबई आणि नवी मुंबई शहरांना थेट जोडण्यासाठी आणि मुंबई महानगर प्रदेशाचा विकास साधण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला होता. सागरी सेतू डिसेंबर २०२३ मध्ये बांधून पूर्ण झाला आणि १२ जानेवारी २०२४ ला या सेतूचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. लोकार्पणानंतर १३ जानेवारी २०२४ पासून सेतू वाहतूक सेवेत दाखल झाला. त्यावेळी दिवसाला ७० हजार वाहने ये-जा करतील असा दावा करण्यात आला होता. मात्र या सेतूला वाहनचालक-प्रवाशांचा म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसल्याने दिसते आहे.

एक वर्षे झाले तरी अटल सेतूवरुन दिवसाला ७० हजारांऐवजी दिवसाला सरासरी २२५०० वाहने धावत आहेत. उपलब्ध माहितीनुसार १३ जानेवारी २०२४ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधीत अटल सेतूवरुन एकूण ८२ लाख ८१ हजार ५२४ वाहने धावली आहेत.एका वर्षाच्या कालावधीत धावलेल्या एकूण ८२ लाख ८१ हजार ५२४ वाहनांमध्ये चारचाकी हलक्या वाहनांची संख्या सर्वाधिक, ७७ लाख ५ हजार ४९७ अशी आहे. मिनीबस, हलक्या व्यावसायिक वाहनांची संख्या ९९ हजार ३५६, बस, ट्रकची संख्या १ लाख १७ हजार ४१४,अवजड वाहनांची संख्या ८९८ तर उर्वरित वाहनांची संख्या ३ लाख ५८ हजार ३५९ अशी आहे. या वाहनांच्या माध्यमातून सेतू वाहतूक सेवेत दाखल झाल्यापासून आतापर्यंत नऊ कोटींहून अधिक रकमेची पथकर वसूली झाली आहे. वाहनसंख्या आणि पथकर वसूलीतून मिळालेला महसूल दोन्ही असमाधानकारक असल्याचे दिसते आहे.

# ज्येष्ठ वकील इक्बाल छागला यांचे निधन

मुंबई

भारतातील आघाडीच्या वकिलांपैकी एक, बॉम्बे बार असोसिएशनचे (बीबीए) प्रमुख सदस्य असलेले ज्येष्ठ वकील इक्बाल छागला यांचे रविवारी दुपारी मुंबईत निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. स्वातंत्र्योत्तर भारतातील मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले



मुख्य न्यायमूर्ती एम. सी छागला यांचे ते पुत्र आणि सध्या उच्च न्यायालयात कार्यरत असलेले न्यायमूर्ती रियाज छागला यांचे ते वडील होत. गेल्या काही दिवसांपासून छागला यांची प्रकृती खालावली होती. रविवारी दुपारी त्यांचे निधन झाले. वरळी येथील स्मशानभूमीत सोमवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (संविधान) या नव्या पक्षाची स्थापना




रमेश औताडे
मुंबई

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (संविधान)" या आणखी एका नव्या पक्षाची स्थापना करण्यात आल्याची घोषणा पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संदेश आंबेडकर यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत सोमवारी केली.

यावेळी संदेश आंबेडकर म्हणाले की, "संविधान धोक्यात आहे. संविधानाचे नाव घेत सत्तेपर्यंत पोहोचलेले लोकप्रतिनिधी आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अजेंड्याला पुढे नेत आहेत. समाजाला शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांपासून दूर करण्याचे कट कारस्थान रचले जात आहे.

पक्षाच्या ध्येयधोरणांवर भाष्य करताना त्यांनी संविधान वाचवणे, लोकशाहीचे रक्षण करणे आणि समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यावर भर दिला.

पक्षाच्या सल्लागारपदी पूज्य भन्ते शिलबोधी थेरो असून, राष्ट्रीय महासचिव पॅन्थर डॉ. राजन माकणीकर, कार्यवाहक योगेश गायकवाड, सचिन भूटकर, महिला आघाडी प्रमुख राणीताई वाघमारे आणि ज्योतीताई गायकवाड यांसह अनेक मान्यवर पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. संदेश आंबेडकर यांनी संविधान वाचवण्यासाठी सर्व भारतीयांना पुढे येण्याचे आवाहन केले. "संविधान हा भारताच्या आत्म्याचा पाया आहे. त्याचे रक्षण हे आपले सर्वोच्च कर्तव्य आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले. संविधान व लोकशाहीवरील वाढत्या धोका आणि सामाजिक स्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली.

# पालिका रुग्णालयांचा कांत्राटदाराकडून औषध पुरवठा बंद

## 120 कोटी थकीत असल्याने घेतला निर्णय

रमेश औताडे
मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २७ रुग्णालयांना ऑल फूड अँड ड्रग लायसन्स होल्डर्स फाउंडेशन ने गेल्या चार वर्षात १२० कोटी रुपयांची औषधे सप्लाय केली होती.



मात्र १२० कोटी रुपये गेल्या चार वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने अद्याप दिले नसल्याने १३ जानेवारी २०२५ पासून औषध पुरवठा थांबवण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. अशी माहिती मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत फाउंडेशनचे अध्यक्ष अभय पांडे यांनी सोमवारी दिली.

पालिकेच्या मध्यवर्ती खरेदी विभागाकडून निविदा प्रक्रिया किंवा दर करारांचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे रुग्णालयांना केवळ स्थानिक खरेदी आणि जुन्या दर करारावर आधारित पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे. सार्वजनिक पैशांचा कोट्यवधींचा अपव्यय होत आहे असे पांडे यांनी यावेळी सांगितले.

सध्याच्या परिस्थितीत रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून, रुग्णसेवेवर गंभीर परिणाम होत आहेत. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त विपिन शर्मा यांना हा विषय सोडवण्याचे निर्देश पालिका आयुक्त यांनी दिलेले आहेत. आम्ही लवकरात लवकर तोडगा निघेल अशी आशा व्यक्त करतो. मात्र आमच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आम्हाला औषध पुरवठा थांबवण्याचा निर्णय कायम ठेवावा लागेल असेही पांडे यांनी यावेळी सांगितले.

# सीएसएमटी प्लॅटफॉर्मचा विस्तार फेब्रुवारीत पूर्ण

मुंबई

मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरील (सीएसएमटी) प्लॅटफॉर्मच्या विस्तारीकरणाचे काम सुरू असून या कामामुळे अनेक रेल्वेगाड्यांच्या थांब्यांमध्ये बदल करण्यात आला आहे; परंतु हे काम पूर्ण झाल्यानंतर या फलाटांवरून २४ डब्यांच्या मेल-एक्स्प्रेस धावू शकतील. प्लॅटफॉर्मच्या विस्तारीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून फेब्रुवारीपर्यंत काम पूर्ण करण्याचे मध्य रेल्वेचे नियोजन आहे.

मध्य रेल्वेवरील सीएसएमटी स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक १० ते १३ च्या विस्तारीकरणासाठी एकूण ६२.१२ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाला २०१५-१६ मध्ये मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर या प्लॅटफॉर्म लांबी ३०५ मीटर ते ३८५ मीटरने वाढवण्याचे काम हाती घेण्यात आले. सीएसएमटीवरील प्लॅटफॉर्म क्रमांक १० आणि ११ च्या विस्तारीकरणाचे काम २ जून २०२४ रोजी पूर्ण झाले.

या कामामुळे येथून २४ डब्यांच्या रेल्वेगाड्या चालविणे शक्य होणार आहे. त्यानुसार मध्य रेल्वे प्रशासनाने मुंबई कोल्हापूर आणि मुंबई होसपेटे या एक्स्प्रेसच्या डब्यांत कायमस्वरूपी वाढ करण्याची घोषणा केली, तर सध्या प्लॅटफॉर्म क्रमांक १२, १३ चे काम हाती घेतले आहे.

प्लॅटफॉर्म क्रमांक १२ आणि १३ ची लांबी ३८५ मीटर असून त्यांची लांबी ६९० मीटरपर्यंत वाढवण्यात येणार आहे. त्यानुसार, फेब्रुवारीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य मध्य रेल्वेने ठेवले आहे. हे काम पूर्ण झाल्यास साधारणपणे ६ ते ८ गाड्यांच्या डब्यांत वाढ होईल, असे मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

## संपादकीय

### स्फोटावर स्फोट

बीड मधील सरपंच देशमुख यांच्या हत्येचे पडसाद सध्या सर्वत्र उमटत आहेत. धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांची सलगी आमदार सुरेश धस धनंजय मुंडे यांचे नाव न घेता इतर सर्व सहभागी नावानिशी जाहीरपणे करीत आहेत. आजही वाल्मीक कराड याची बेनामी मालमत्ता ज्या निकटवर्तीयांनी धारण केलेली आहे. त्यांच्या नावानिशी त्या मालमत्तेची किंमत आणि मालमत्तेची ठिकाणे जाहीर केलेली आहेत. आजच्या आमदार धस यांनी आरोपांमध्ये जे मुद्दे मांडले. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या लोकांच्या नावावरच्या मालमत्ता आहेत. जी नावे आहेत, ती जगजाहीर केली. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडालेली आहे. आमदार धस यांनी आरोपांमध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये सुशील पाटील या बिल्डरच्या पूर्ण होत असलेल्या प्रकल्पात पुण्यातील एफसी रोडवर वैशाली हॉटेलच्या बाजूला सात व्यावसायिक गाळे म्हणजेच सात दुकाने (शॉप) छोटा आका काढते आहे. म्हणजेच वाल्मीक कराड यांच्या नोकरच ही मालमत्ता आहे. त्याची किंमत प्रत्येकी पाच कोटी आहे. ही प्रॉपर्टी सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी विष्णू चाटेची बहिण आणि वाल्मीक कराड यांची दुसरी पत्नी ज्योती जाधव यांच्या नावावर या एकाच ठिकाणी चाळीस कोटींची मालमत्ता आहे. विशेष म्हणजे धस यांनी त्या बिल्डरची भेट घेऊन आलो असेही सांगितले. त्या बिल्डरकडे या छोट्या आकाने म्हणजेच वाल्मीक कराड याने 35 कोटींचे टेरेस मागितले होते. त्या ठिकाणी एका फ्लॅटची किंमत 15 कोटी आहे आणि या ठिकाणचा एक संपूर्ण मजला वाल्मीक कराडच्या ड्रायव्हरच्या नावावर आहे. त्याची किंमत 75 कोटी आहे. याच ड्रायव्हरच्या नावावर त्याच ठिकाणची जवळपास पंधरा ते वीस एकर शेती आहे. त्या ठिकाणी कधीही राहण्यासाठी वाल्मीक कराड याने विशेष कारनामा त्या ड्रायव्हरकडून करून घेतलेला आहे, असाही खळबळजनक आरोप आहे. आज जवळपास 115 ते 120 कोटींच्या मालमत्तेच्या कागदोपत्री मालक असलेल्या व्यक्तींची नावे सुरेश धस यांनी जाहीरपणे तेथील बाजार मूल्याच्या किमती आणि पुराव्यासह दिलेली आहेत. अर्थात हे सुरेश धस यांचे म्हणणे आहे. त्यासोबतच वाल्मीक कराड यांना 2022 मध्ये ईडीची नोटीस आली होती. हेही त्यावेळी त्यांनी सांगितले. सुरेश धस म्हणतात त्याप्रमाणे मोठे आका आणि त्यांचा छोटा आका म्हणजे वाल्मीक कराड यांचे दोघांचेही वेगवेगळे उद्योग आहेत. परळी शहरात या दोन्ही आकांच्या सांगण्यावरून हवी तशी खंडणी जमा करण्याचे काम केले जाते. या ठिकाणी इराणी टोळ्या या दोन आकांच्या जीवावर अवैध धंदे करतात. पिस्तुलाचे परवाने घेतात आणि मोठमोठ्या उद्योगांच्या कार्यालयात जाऊन हप्ते मागतात. यांच्या हप्त्याला कंटाळून एका सिमेंट कंपनीने परळी मधून गाशा गुंडाळलेला आहे. ती कंपनी का सोडून गेली, याचे उत्तर बाहेर असणाऱ्या आकाने द्यावे. असे आव्हान सुरेश धस करायला विसरले नाहीत. त्याचबरोबर प्रतिमोर्चे काढणाऱ्यांना सरपंच संतोष देशमुख यांच्या मुली आणि त्यांच्या डोळ्यातील पाणी दिसत नाही का? असाही त्यांनी प्रतिप्रश्न केला. आता एवढे गंभीर आरोप असलेल्या या कराड नामक महनीय व्यक्तीचे काय करावे, हा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. या प्रश्नाला घेऊन सरकारमध्येही तणावाचे वातावरण निर्माण झालेले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या घटनेची अत्यंत गंभीरपणे दखल घेतलेली आहे. सरपंच संघटनेपासून अनेक संघटनांनी केवळ कराड यांच्यावरच आरोप केले नाहीत. तर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केलेली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अजून तरी धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितलेला नाही. काल अजित पवार आणि अमित शहा यांची भेट झाली. त्यात काय घडले, हे अद्याप तरी गुलदस्त्यातच आहे. संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या सरपंच देशमुख यांची हत्या केवळ बीड जिल्हा, केवळ मराठवाडा, केवळ महाराष्ट्र किंवा केवळ राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यापुरता मर्यादित विषय आता राहिलेला नाही. दररोज नवे नवे स्फोटावर स्फोट होत आहेत. जाहीरपणे आरोपांच्या फैरी झडत आहेत. त्याचप्रमाणे आरोप करणारे जाहीरपणे पुरावे दाखवीत आहेत. पण अजूनही अटक होण्याच्या पलीकडे कराडच्या केसालाही धक्का लागलेला नाही. त्यासोबतच धनंजय मुंडे यांनाही जाब विचारलेला नाही, अशी तक्रार सर्वसामान्यांची आहे. आपल्या महाराष्ट्राचे राजकारण कोणत्या थराला गेलेले आहे. याचा हा मोठाच पुरावा आहे. महाराष्ट्र अत्यंत सभ्य राजकारणी पुढाऱ्यांचा, नेतृत्व करणाऱ्यांचा प्रदेश आहे. असा जो काही आपला लौकिक होता. हा लौकिक आजही कायम ठेवायचा असेल तर खूप गरजेचे आहे. त्यासाठी आता या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय खून झालेल्या सरपंचाच्या आत्म्याला शांती कशी मिळेल. राजकारणाच्या वाटेवर अशी अपघाती वळणे आली. तर सभ्य लोक राजकारणात कसे येतील. आजही अनेक जिल्ह्यात अत्यंत सुसंस्कृत राजकारण करणारे अनेक नामवंत पुढारी आहेत. राजकारणातील मतभेद अशा घातक स्तरावर जाऊ नयेत, असे महाराष्ट्रातील जनतेला नेहमीच वाटते. क्षुद्र राजकीय लाभासाठी आपण आपली पातळी किती खाली घेऊन जावी. याचाही विचार करणे अतिशय गरजेचे आहे. एकूणच हे प्रकरण कोणत्या थराला जाईल, त्याचा सामाजिक काय परिणाम होईल. पुढे जाऊन सरकारला काय उत्तरे द्यावी लागतील. ते कुणालाच सांगता यायचे नाही. आपण केवळ जे जे होत आहे. ते ते बघावे आणि तोंडावर चिकटपट्टी लावून गप्प बसावे.

### नेहमीची फाटाफूट

इंडिया आघाडी फक्त लोकसभेसाठी होती, असे आता काँग्रेसने स्पष्ट केलेले आहे. काँग्रेसचे पवन खेडा यांनी या गोष्टीवर शिक्कामोर्तब केल्यावर आता इंडिया आघाडीचे विविध पक्ष आपापल्या मनाप्रमाणे आणि मताप्रमाणे राजकारण करतीलच. प्रश्न असा आहे की, इंडिया आघाडीतील घटक पक्ष अनेक राज्यात परस्परांच्या विरुद्ध उभे राहतात. त्यामुळे म्हणा किंवा अंतर्गत मतभेदामुळे म्हणा इंडिया आघाडीचे विघटन होते. हे जवळजवळ ठरलेलेच आहे. काँग्रेस पक्ष या आघाडीतील देशभरात पसरलेला सर्वाधिक मोठा पक्ष होता. काँग्रेसची सर्व धोरणे इंडिया आघाडीतील इतर घटकांना किंवा घटक पक्षांना मान्य नव्हती. राहुल गांधींचा अदानी विरोध अनेक राज्यांना पचला नाही. काँग्रेस आधीपासूनच जवळजवळ अलिप्त होती. लोकसभेतील इंडिया आघाडीमध्ये सध्या पश्चिम बंगालने स्वतःची वेगळी वाट चोखाळली होती. काँग्रेसला पश्चिम बंगालमध्ये दारूण अपयशाला सामोरे जावे लागले. तीच परिस्थिती उत्तर प्रदेशातील सपाबद्दल उद्भवली. लोकसभेत खांद्याला खांदा लावून लढणारे राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांची मैत्री आता जवळजवळ भंगली आहे. आम आदमी पक्षाबद्दल तर बोलायलाच नको. त्यांनी काँग्रेसच्या मतावरच डल्ला मारल्याने दिल्लीतील काँग्रेसजन आम आदमी पक्षाचा घोर विरोध करीत आहेत. एकूणच आपल्या देशातील विरोधी पक्ष आतापर्यंत आपसातच फाटाफुटीचे राजकारण करीत होते. एक तर या आघाडीतील सर्व पक्षांनी सर्वमान्य नेता कोण हे कधी ठरवलेच नाही. आधी अशी आघाडी करण्याची कल्पना बिहारच्या नितीश कुमार यांनी काढली होती. त्यांनीच अनेक राज्यांचा दौरा करून ही आघाडी एकजीव होईल. अशी आशा करत नवीन कल्पना मांडली होती. पण दोन-तीन सभा झाल्यानंतर नितीश कुमार यांच्या नेतृत्वावर सहमती न झाल्यामुळे नितीश कुमार यांची मती फिरली आणि ते सहजच एनडीएसी झाले. इंडिया बसलेला तो पहिला झटका होता. किंबहुना नितीश कुमार यांचा पक्ष बदल झाला नसता. तर एनडीएला बिहारमध्ये देदीप्यमान यश मिळालेच नसते. एकूणच या इंडियातील घटक पक्षांची गोळा बेरीज केल्यावर असे दिसते आहे की, हे सर्वच पक्ष सैरभैर झालेले आहेत. भारतीय जनता पक्षाला संपूर्ण बहुमत मिळालेले नसले. तरी आता या सरकारला फारसा धोका दिसत नाही. काँग्रेस पक्ष म्हणा किंवा इतर पक्ष म्हणा. निवडणुका जवळ आल्या म्हणजे त्यांच्या हालचाली सुरू होतात. काँग्रेस पक्ष बलाढ्य असताना त्याचा फायदा त्या पक्षाला मिळत होता. आता ती जागा भारतीय जनता पक्षाने घेतलेली आहे. दक्षिण भारतामध्ये याच पक्षाला म्हणजेच भारतीय जनता पक्षाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसला, तरी संपूर्ण देशव्यापी किंवा राष्ट्र्यापी पक्ष म्हणून आता भारतीय जनता पक्षाला स्थान देण्यात येते. एनडीएमधील छोटे-मोठे अनेक पक्ष असले. तरी त्यापैकी कोणताही पक्ष सरकारच्या पाठिंबा काढण्यास तयार होईल, असे सध्यातरी अजिबात वाटत नाही. अशा सर्व परिस्थितीमध्ये यापुढे इंडिया आघाडीतील घटक पक्ष पुढील लोकसभेच्या निवडणुकीआधी चुंबाचुंबी करतील. पण जोपर्यंत या पक्षांचे 'स्थायी' मनोमीलन होत नाही. तोपर्यंत भारतीय जनता पक्षाला किंवा एनडीएला कोणताही धोका नाही, असेच दिसते.

# जपान आणि भारत: धोरणात्मक भागीदारीची 20 वर्षे

गेल्या दोन दशकांमध्ये जपान-भारत संबंध इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील एक महत्त्वाची आणि निर्णायक भागीदारी म्हणून विकसित झाले आहेत. जरी शिंजो आबे यांना दोन्ही देशांमधील परस्पर विश्वास दृढ करण्यात यशस्वी मानले जाते, तरी या संबंधांचा पाया युकिओ हातोयामा, नाओतो कान, आणि योशिहिको नोदा यांच्या कार्यकाळात आधीच घालण्यात आला होता, जे आबे यांच्या २०१२ मध्ये सत्तेत परतण्यापूर्वी सत्तेवर होते. त्यांच्या तुलनेने कमी कालावधीच्या कार्यकाळानंतरही, या नेत्यांनी भारतासोबतचे राजकीय, आर्थिक आणि धोरणात्मक सहकार्य पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, प्रादेशिक स्थैर्यास प्रोत्साहन देणे आणि चीनच्या वाढत्या प्रभावाला संतुलित करणे यामध्ये भारताच्या महत्त्वाची जाणीव ठेवली. द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याची ही प्रवृत्ती नंतरच्या नेत्यांकडून, जसे की फुमिओ किशिदा यांच्या नेतृत्वाखाली, टिकवली गेली आणि विद्यमान इशीबा प्रशासनाखाली देखील ती अधिक विकसित होण्याची अपेक्षा आहे.


कॉरिडॉरमधील जपानची भूमिका, आर्थिक सहकार्य आणि धोरणात्मक संपर्क यांचे संगम दाखवित होती आणि भारत हा इंडो-पॅसिफिक प्रदेशातील एक महत्त्वाचा भागीदार बनू शकतो, याबाबतच्या जपानच्या मान्यतेवर भर दिला.

**धोरणात्मक पुनर्बांधणीचा काळ**

2009 मध्ये युकियो हातोयामा यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळापासून, जागतिक आर्थिक मंदी आणि बदलती प्रादेशिक स्थित्यंतरे याच्या पार्श्वभूमीवर जपानने आपल्या परराष्ट्र धोरणाची पुनर्रचना करण्याची प्रक्रिया सुरू केली. हातोयामा प्रशासनाने "पूर्व आशियाई समुदाय" या संकल्पनेभोवती आपले परराष्ट्र धोरण केंद्रित केले. या दृष्टीकोनाचा उद्देश प्रादेशिक एकत्रीकरण अधिक दृढ करणे आणि आर्थिक बहुपक्षीय संबंध अधिक मजबूत करणे हा होता. टोकियोतील तज्ज्ञांच्या मते, उदयोन्मुख शक्ती आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला भारत हा या चौकटीसाठी स्वाभाविक भागीदार ठरला. हातोयामा सरकारने भारतासोबत आर्थिक संबंध मजबूत करण्यावर भर दिला आणि दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसारख्या प्रकल्पांना सुरुवात केली, ज्यामुळे भारतातील उत्पादन उद्योगांना एकत्रितरीत्या चालना मिळाली. या कॉरिडॉरमधील जपानची भूमिका, आर्थिक सहकार्य आणि धोरणात्मक संपर्क यांचे संगम दाखवित होती आणि भारत हा इंडो-पॅसिफिक प्रदेशातील एक महत्त्वाचा भागीदार बनू शकतो, याबाबतच्या जपानच्या मान्यतेवर भर दिला. जपानी आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (JICA) च्या माध्यमातून भारतीत पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासासाठी गुंतवणूक सुरू झाली. मात्र, जरी भारतासोबतची आर्थिक भागीदारी अधिक दृढ होत होती, तरीही हातोयामा यांच्या सावध संरक्षण सहकार्याच्या दृष्टिकोनामुळे चीनला प्रतिकार करण्याच्या धोरणामध्ये एक प्रकारचा संकोच दिसून आला.

**रणनीतीच्या मजबुतीकरणाचा काळ**

2010 मध्ये हातोयामा यांच्यानंतर आलेल्या नाओतो कान यांच्या प्रशासनाला 2011 च्या भूकंप आणि फुकुशिमा अणुऊर्जा आपत्तीमुळे मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागले. या संकटांनंतरही, नाओतो कान यांनी आपल्या पूर्ववर्तींच्या पावलावर पाऊल ठेवून भारतासोबतच्या जपानच्या संबंधांना अधिक दृढ करण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या प्रशासनाच्या काळात जपान-भारत सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराची (Japan-India Comprehensive Economic Partnership Agreement) सुरुवात झाली. या महत्त्वपूर्ण कराराचा उद्देश व्यापारातील अडथळे कमी करून 2014 पर्यंत द्विपक्षीय व्यापार US$25 अब्जांपर्यंत वाढवणे हा होता. कान यांच्या प्रशासनाने अणुऊर्जेवरील साशंकतेच्या पार्श्वभूमीवर जपानच्या ऊर्जा भागीदारीचे विविधीकरण करण्याचे धोरण मान्य केले. यामुळे भारतासोबत नागरी अणुऊर्जा सहकार्य करारासाठी चर्चेला चालना मिळाली. जरी हा नागरी अणुऊर्जा करार 2017 पर्यंत औपचारिकरित्या स्वाक्षरीत झाला नाही, तरीही या चर्चांमधून भारताच्या प्रमुख अणुशक्ती म्हणून असलेल्या भूमिकेवरील जपानचा विश्वास वाढल्याचे दिसून आले. सागरी क्षेत्रात, कान यांच्या प्रशासनाने भारतासोबत मालाबार संयुक्त नौदल सरावाच्या अनेक मालिकांमध्ये भाग घेतला. यामुळे भारतीय महासागरात नेव्हिगेशनच्या स्वातंत्र्य आणि स्थैर्य राखण्याविषयी वाढती रुची दिसून आली. जरी कान यांच्या अंतर्गत समस्यांमुळे त्यांच्या परराष्ट्र धोरणाच्या कक्षेत काही प्रमाणात मर्यादा आल्या, तरीही त्यांच्या कार्यकाळात जपान-भारत संबंध संस्थात्मक मजबूत करण्यामध्ये मोठे योगदान मिळाले.



नाओतो कान यांच्या प्रशासनाने अणुऊर्जेवरील साशंकतेच्या पार्श्वभूमीवर जपानच्या ऊर्जा भागीदारीचे विविधीकरण करण्याचे धोरण मान्य केले. यामुळे भारतासोबत नागरी अणुऊर्जा सहकार्य करारासाठी चर्चेला चालना मिळाली.

कान यांच्या पाठोपाठ, योशिहिको नोदा यांनी 2011 मध्ये प्रशासनाची धुरा सांभाळली आणि भारतासोबतच्या संरक्षण सहकार्यावर अधिक लक्ष केंद्रीत केले. तसेच, इंडो-पॅसिफिक क्षेत्रात दोन्ही देशांमधील रणनीतिक एकत्रीकरणाची गरज ओळखली. नोदा यांच्या कार्यकाळात जपानने भारतासोबतच्या 'जपान-भारत रणनीतिक व जागतिक भागीदारी'ला नव्याने चालना दिली. यात केवळ आर्थिक भागीदारीच नव्हे, तर सुरक्षा आणि संरक्षण सहकार्यावरही भर देण्यात आला.

नोदा यांच्या प्रशासनाने भारतासोबत तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या चर्चेची सुरुवात केली, ज्यामुळे जपानच्या पारंपरिक शांततावादी (pacifist) युद्धोत्तर भूमिकेत मोठा बदल दिसून आला. त्यांनी सागरी सुरक्षेसाठी जवळचे सहकार्य प्रोत्साहित केले, ज्यामध्ये 2012 मध्ये गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि संयुक्त सराव यांचा समावेश होता. हे प्रयत्न चीनच्या प्रादेशिक शक्तीच्या वाढीच्या पार्श्वभूमीवर इंडो-पॅसिफिक क्षेत्राच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण ठरले. नोदा यांच्या या धोरणाने भारताची संरक्षण भागीदारी मजबूत करण्याच्या आणि रशियासारख्या पारंपरिक भागीदारांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्दिष्टाशी सुसंगत होती. आर्थिकदृष्ट्या, नोदा यांच्या सरकारने भारतातील उत्पादन आणि शहरी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीला गती दिली, विशेषतः भारताच्या स्मार्ट सिटी उपक्रमांमध्ये जपानी सहभाग वाढवून.

**रणनीतीच्या उन्नतीचा काळ**

2012 मध्ये शिंझो आबे पुन्हा सत्तेवर येईपर्यंत जपान-भारत संबंध मोठ्या उंचीवर पोहोचण्यासाठी सज्ज झाले होते. जपान-भारत द्विपक्षीय संबंधांच्या सर्वात मजबूत कालखंडांपैकी एकाचा पाया घालण्यात हा टप्पा महत्त्वाचा ठरला. चीनच्या वाढत्या प्रादेशिक प्रभावाला तोलून धरण्याच्या त्यांच्या धोरणात्मक दृष्टीकोनासाठी प्रसिद्ध असलेल्या आबे यांनी भारताला फ्री अँड ओपन इंडो-पॅसिफिक (FOIP) धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवले. आबे यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे हे FOIP धोरण, जे टोकियोच्या प्रादेशिक आणि जागतिक भागीदारांसोबतच्या धोरणात्मक संबंधांना मजबूत करण्यासाठी आजही केंद्रबिंदू आहे. FOIP हे जपान-भारत संबंधांचे मुख्य आधारस्तंभ बनले आहे, ज्यामध्ये इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सामायिक मूल्ये आणि हितसंबंध यांना अधोरेखित करण्यात आले आहे.

आबे प्रशासनाने दरवर्षी आयोजित होणाऱ्या परराष्ट्र आणि संरक्षण मंत्र्यांच्या "2+2" संवाद प्रक्रियेला स्थैर्य दिले, ज्यामुळे दोन्ही देशांतील रणनीतिक एकसंधतेचे संबंध अधिक बळकट झाले. संरक्षण सहकार्य अभूतपूर्व पातळीवर पोहोचले, ज्यामध्ये जपान मालाबार नौदल सरावाचा कायमस्वरूपी सहभागी बनला आणि भारतासोबत संरक्षण उपकरणे आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याशिवाय, आबे यांनी भारताशी आर्थिक संबंध आणखी दृढ केले. त्यांनी भारतातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली, ज्यामध्ये मुंबई-अहमदाबाद हाई स्पीड रेल्वे प्रकल्पासाठी US$15 अब्जांची गुंतवणूकही समाविष्ट होती. JICA च्या आंशिक निधीतून राबवण्यात आलेल्या या उपक्रमांनी परस्पर विश्वास आणि दीर्घकालीन सहकार्याच्या दृष्टीकोनाचे प्रतीकत्व केले.

आबे यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे हे FOIP धोरण, जे टोकियोच्या प्रादेशिक आणि जागतिक भागीदारांसोबतच्या धोरणात्मक संबंधांना मजबूत करण्यासाठी आजही केंद्रबिंदू आहे.

आबे यांच्या प्रशासनाखाली भारत आणि जपानने केवळ आर्थिक आणि संरक्षण क्षेत्रांवरच नाही, तर सांस्कृतिक आणि सॉफ्ट पॉवर राजनैतिक संबंधांवरही भर दिला. याला अधिकृत स्वरूप 2017 हे वर्ष "भारत-जपान मैत्री विनिमय वर्ष" म्हणून जाहीर करून देण्यात आले. आबे प्रशासनाने जपानमध्ये शिक्षणासाठी भारतीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची संख्या वाढवली, लोकांमधील संबंध अधिक दृढ केले आणि 2020 मध्ये होणाऱ्या टोकियो ऑलिम्पिक्ससाठी भारताच्या पाठिंब्याचे स्वागत केले. या प्रयत्नांमुळे परस्पर समज आणि सौहार्द वाढले, ज्याने वाढत्या रणनीतिक एकात्मतेला पूरक भूमिका बजावली. आबे यांच्या कार्यकाळात भारत-जपान संबंध एका व्यापक भागीदारीत रूपांतरित झाले आणि भविष्यातील नेत्यांसाठी एक उच्च दर्जाचा मापदंड निर्माण केला.

व्यवहारिक सातत्य आणि वाढलेल्या सहभागाचा काळ

योशिहिदे सुगा यांच्या कार्यकाळात शिंझो आबे यांचा वारसा कायम ठेवण्यावर भर देण्यात आला, विशेषतः फ्री अँड ओपन इंडो-पॅसिफिक (FOIP) दृष्टिकोन पुढे नेणे आणि ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका यांचा समावेश असलेल्या क्वेड्रिलेटराल सिक्युरिटी डायलॉग मधील सहकार्य बळकट करणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. सुगा यांनी सप्लाय चेन भागीदारीद्वारे आर्थिक स्थैर्यावर भर दिला आणि कोविड-19 महामारीदरम्यान भारताला मदत केली. त्यामुळे या रणनीतिक भागीदारीला अधिक गती मिळाली आणि संबंध अधिक दृढ झाले.

फुमियो किशिदा, ज्यांनी 2021 मध्ये पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली, त्यांनी या वारशावर मोठ्या प्रमाणावर भर दिला आणि सायबर सुरक्षा, सप्लाय चेनमध्ये स्थैर्यता आणि हरित उर्जेसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले. जागतिक सप्लाय चेनच्या विविधीकरणात भारताच्या महत्त्वपूर्ण भूमिकेला ओळखून, किशिदा प्रशासनाने सेमीकंडक्टर आणि दुर्मिळ खनिजे यांसारख्या उद्योगांमध्ये चीनच्या वर्चस्वाला पर्याय विकसित करण्यावर भर दिला आणि भारतात US$42 अब्ज गुंतवणुकीचे आश्वासन दिले. याशिवाय, किशिदा यांच्या कार्यकाळात सुरू झालेल्या जपान-भारत डिजिटल भागीदारीने 2023 पासून कृत्रिम बुद्धिमत्ता AI आणि सप्लाय चेन तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्याला चालना दिली. किशिदा यांच्या व्यवहार्य दृष्टिकोनामुळे दोन्ही देशांतील संबंधांमध्ये स्थिर वाढ झाली असून, नवकल्पना आणि स्थिरता या गोष्टींवर आवश्यक भर देण्यात आला आहे.

जागतिक सप्लाय चेनच्या विविधीकरणात भारताच्या महत्त्वपूर्ण भूमिकेला ओळखून, किशिदा प्रशासनाने सेमीकंडक्टर आणि दुर्मिळ खनिजे यांसारख्या उद्योगांमध्ये चीनच्या वर्चस्वाला पर्याय विकसित करण्यावर भर दिला आणि भारतात US$42 अब्ज गुंतवणुकीचे आश्वासन दिले.

आगामी मार्गावर नजर टाकता, शिगेरू इशीबा यांचे प्रशासन जपान-भारत भागीदारीला नवीन दिशा देण्याची शक्यता आहे. इशीबा, जो सक्रिय सुरक्षा धोरणाचा प्रबळ समर्थक आहे, तो संरक्षण सहकार्य आणि भारत व इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील बहुपक्षीय सहभागाला प्राथमिकता देण्याची शक्यता आहे. त्याच्या प्रशासनामुळे संयुक्त तंत्रज्ञान विकासात गती येऊ शकते, सैन्य प्रशिक्षण वाढवले जाऊ शकते, आणि दोन्ही देशांमध्ये गुप्तचर माहितीचे आदान-प्रदान मजबूत करण्याचे प्रयत्न होऊ शकतात, कारण चीनला प्रतिकार करण्याची आवश्यकता वाढली आहे. याव्यतिरिक्त, इशीबा यांच्या अंतराळ संशोधन आणि प्रगत तंत्रज्ञानामधील रुचीमुळे सॅटेलाइट तंत्रज्ञानासारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्याचे नवे मार्ग उघडू शकतात.

असो, भू राजकीय परिस्थिती सतत बदलत असली तरी, जपान आणि भारताची भागीदारी प्रादेशिक स्थिरतेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहील, जो सामायिक लोकशाही मूल्ये आणि स्थिर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या प्रति बांधिलकीला अधोरेखित करेल.

# डिजिटल पर्सनल डेटा संरक्षण कायदा: भारतातील एआय संचालित फिनटेक क्षेत्राचा विकास

भारतामध्ये फिनटेक (वित्तीय तंत्रज्ञान - फायनॅन्सीयल टेक्नॉलॉजी) क्षेत्राचा वेगाने विस्तार झाला आहे, ज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे वित्तीय सेवांमध्ये परिवर्तनात्मक नवकल्पनांचा कालखंड सुरू झाला आहे. AI ने वैयक्तिकरण, फसवणुकीचा शोध घेणे आणि ऑपरेशनल कार्यक्षमता यामध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे, ज्यामुळे वित्तीय क्षेत्राचा पाया बदलला आहे. मात्र, या प्रगतीस डेटा गोपनीयतेविषयी असलेल्या चिंतेची जोड आहे. उद्योगक्षेत्राची वैयक्तिक डेटा वर वाढती अवलंबता डेटा सुरक्षा, ग्राहक स्वायत्तता आणि दुरुपयोगाच्या धोक्यांविषयी गंभीर प्रश्न उभे करते. उत्तर म्हणून, भारतीय नियामकांनी एक सक्रिय दृष्टिकोन स्वीकारला आहे, जो तंत्रज्ञानाच्या नवकल्पनांच्या आवश्यकता आणि ग्राहक हक्क व गोपनीयतेचे संरक्षण यामध्ये न्यायपूर्ण संतुलन साधण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे वित्तीय सेवांमध्ये परिवर्तनात्मक नवकल्पनांचा कालखंड सुरू झाला आहे. AI ने वैयक्तिकरण, फसवणुकीचा शोध घेणे आणि ऑपरेशनल कार्यक्षमता यामध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे, ज्यामुळे वित्तीय क्षेत्राचा पाया बदलला आहे. मात्र, या प्रगतीस डेटा गोपनीयतेविषयी असलेल्या चिंतेची जोड आहे.

जसे-जसे संस्था त्यांच्या कार्यप्रणाली आणि सेवा वितरणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश करतात, त्याच्या तैनातीसाठी स्पष्ट मानके स्थापित करण्याची आवश्यकता एक महत्त्वाची आर्थिक गरज बनते. अशा मानकांची निर्मिती ही महत्त्वाची आहे, कारण ती सुनिश्चित करते की एआय-चालित नवकल्पना कार्यक्षमतेत आणि उत्पादनक्षमतेत वाढ घडवते, आणि पक्षपातीपणा, एथिक्सचे प्रश्न, आणि बाजारातील विकृततेसारख्या धोक्यांची कमी करते. जबाबदार एआय वापरासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करून, धोरणकर्ते ग्राहकांचा विश्वास प्रोत्साहित करू शकतात, प्रामाणिक स्पर्धा सुनिश्चित करू शकतात, आणि तंत्रज्ञानावर आधारित वाढत्या परिदृश्यात दीर्घकालीन आर्थिक स्थिरतेला मदत करू शकतात.

डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्टची भूमिका

भारतीय फिनटेक कंपन्यांनी विविध एप्लिकेशन्समध्ये एआयचा वापर सुरू केला आहे, जे वित्तीय क्षेत्रातील डेटा-आधारित इनोवेशनच्या दिशेने एक व्यापक बदल दर्शवित आहे. पेटीएम, एक प्रमुख डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म, एआयचा वापर युजर बिहेविअर आणि ट्रांझॅक्शन हिस्ट्री विश्लेषित करण्यासाठी करते, ज्यामुळे ते वैयक्तिककृत वित्तीय उत्पादनांची शिफारशी देऊ शकते. उदाहरणार्थ, त्याचे अल्गोरिदम वापरकर्त्यांच्या खर्चाच्या पद्धती आणि वित्तीय लक्ष्यांच्या आधारे कस्टमाइज्ड क्रेडिट पर्याय सुचवितात, ज्यामुळे सहभाग आणि समाधानही वाढते. त्याचप्रमाणे, स्टेट बँक ऑफ इंडियाने एसआयए SIA, एक एआय-संचालित चॅटबोट, सुरू केला आहे, जो एका सेकंदात १०,००० ग्राहकांच्या चौकशीचे निराकरण करू शकतो. संवादांमधून सतत शिकत, SIA ने ग्राहक सेवेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा केली आहे.

फिनटेक क्षेत्रातील डेटा गोपनीयतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारताच्या धोरणातील एक प्रमुख सुरुवात म्हणजे 2023 मध्ये लागू करण्यात आलेला डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट (DPDPA) आहे. हे विधेयक वैयक्तिक डेटाचे संरक्षण आणि तांत्रिक नवकल्पनांना चालना देणे यामध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न करते. या कायद्याच्या चौकटीत फिनटेक कंपन्यांना वैयक्तिक डेटा प्रक्रिया करण्यापूर्वी वापरकर्त्यांची स्पष्ट परवानगी घेणे आवश्यक आहे, ज्यामुळे अधिक पारदर्शकता आणि वैयक्तिक माहितीसाठी नियंत्रणाची खात्री होते. युरोपियन युनियनच्या जनरल डेटा प्रोटेक्शन रेग्युलेशन (GDPR) सारख्या जागतिक निकषांशी सुसंगत राहून, DPDPA डेटा गोपनीयतेच्या शासकीय व्यवस्थेसाठी एक व्यापक मानक म्हणून स्वतःची ओळख निर्माण करते.

हा कायदा व्यक्तींना त्यांचा डेटा वापरण्याचा, सुधारण्याचा आणि हटवण्याचा अधिकार देणाऱ्या महत्त्वाच्या तरतुदी सादर करतो, ज्यामुळे त्यांना त्यांच्या वैयक्तिक माहितीवर अधिक नियंत्रण मिळते. फिनटेक कंपन्यांसाठी, हा कायदा कठोर सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्याची जबाबदारी ठेवीत आहे, जे डेटा अखंडता



आणि संरक्षण सुनिश्चित करतात. याशिवाय, तक्रार निवारण यंत्रणा स्थापन केल्यामुळे डेटाच्या गैरवापराशी संबंधित वाद सोडवण्यासाठी संरचित मार्ग उपलब्ध होतो, ज्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि एक अशी परिसंस्था निर्माण होते जिथे नवकल्पना आणि अनुपालन एकत्र नांदतात.

DPDPA चे प्रतिबंधक सामर्थ्य हे कायद्याचे पालन न केल्यास ठोठावण्यात येणाऱ्या मोठ्या दंडांमध्ये आहे, ज्यामध्ये INR 2.5 अब्ज (सुमारे US$30 दशलक्ष) पर्यंतचा दंड लागू होतो. जागतिक स्तरावर सर्वात कठोर दंडांपैकी एक असलेल्या या उपायांद्वारे अल्पकालीन नफ्याच्या उद्दिष्टांपेक्षा डेटा संरक्षणाला प्राधान्य देण्यावर नियामक भर दिसून येतो. आर्थिक दृष्टिकोनातून, DPDPA डेटा उल्लंघनांशी संबंधित बाह्य परिणाम कमी करतेच, पण ग्राहकांचा विश्वास टिकवण्याची विश्वासार्ह बांधिलकीही व्यक्त करते—जे एका लवचिक आणि नवकल्पनांनी प्रेरित फिनटेक परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. गोपनीयतेला आपल्या नियामक चौकटीत समाविष्ट करून, DPDPA मार्केटची कार्यक्षमता आणि ग्राहक संरक्षण यांच्यातील महत्त्वाच्या परस्परसंबंधाला अधोरेखित करते.

डिझाइनद्वारे प्रायव्हसी

कायदेशीर हस्तक्षेपांच्या पलीकडे, भारतीय नियामक डेटा गोपनीयतेच्या शासकीय व्यवस्थेसाठी फिनटेक कंपन्यांना "डिझाइनद्वारे प्रायव्हसी" (Privacy by design) या तत्त्वांचा समावेश करण्यास प्रोत्साहन देत आहेत, जे सक्रिय आराखड्याच्या दिशेने एक पाऊल आहे. या दृष्टिकोनाचा भर उत्पादनाच्या जीवनचक्राच्या प्रत्येक टप्प्यावर गोपनीयतेचा विचार करण्यावर आहे, संकल्पनेपासून आणि विकासापासून ते नियुक्तीपर्यंत. डेटा संकलन कमी करून आणि टेक्नॉलॉजीकल संरचनेत मजबूत गोपनीयता संरक्षण संस्थात्मक करून, हा दृष्टिकोन प्रायव्हसीला एक विनियामक विचार न ठरवता एक मूलभूत डिझाइन तत्त्व म्हणून सुनिश्चित करतो.

डिझाइनद्वारे प्रायव्हसी' या आराखड्याचा स्वीकारण्याचे अनेक महत्त्वाचे फायदे आहेत. उत्पादन विकासाच्या प्रारंभिक टप्प्यांतच गोपनीयतेचा विचार समाविष्ट करून, कंपन्या नियामक आवश्यकता आधीच पूर्ण करू शकतात, त्यामुळे भविष्यातील कायदा मोडून महागडा दंड भरण्याचा धोका कमी होतो. हा सक्रिय दृष्टिकोन ग्राहकांचा विश्वास वाढवतो, विशेषतः जेव्हा व्यक्ती त्यांच्या वैयक्तिक डेटाच्या मूल्यमापनाबाबत अधिक जागरूक होतात. याशिवाय, हा आराखडा संस्थांमध्ये जबाबदारी आणि डेटा व्यवस्थापनाची संस्कृती निर्माण करतो, गोपनीयतेला एक मुख्य व्यवसाय उद्दिष्ट म्हणून बळकटी देतो, ज्याला दुय्यम बाब म्हणून पाहिले जात नाही. भारतासारख्या देशात, जिथे डेटा उल्लंघन आणि गैरवापराबाबतची सार्वजनिक चिंता तीव्र आहे, 'डिझाइनद्वारे प्रायव्हसी' हा एक धोरणात्मक फरक ठरू शकतो, जो कंपन्यांना बाजारपेठेत स्पर्धात्मक प्राधान्य देतो.

उत्पादन विकासाच्या प्रारंभिक टप्प्यांतच गोपनीयतेचा विचार समाविष्ट करून, कंपन्या नियामक आवश्यकता आधीच पूर्ण करू शकतात, त्यामुळे भविष्यातील कायदा मोडून महागडा दंड भरण्याचा धोका कमी होतो.

तथापि, 'डिझाइनद्वारे प्रायव्हसी' लागू करताना काही आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. यावर होणारी एक प्रमुख टीका म्हणजे यामुळे नवकल्पनेवर बंधने येऊ शकतात, कारण प्रारंभिक टप्प्यात गोपनीयतेचे संरक्षण केल्यामुळे डेटा संकलन मर्यादित होऊ शकते, ज्यामुळे अत्यंत वैयक्तिकृत सेवा विकसित करण्यास अडथळा येतो. फिनटेक स्टार्टअप्स आणि लहान उद्योगांसाठी, सुरक्षित प्रणाली तयार करणे आणि डेटा हाताळण्यात पारदर्शकता सुनिश्चित करणे यासारख्या संसाधनांशी संबंधित मागण्या पूर्ण करताना मोठा आर्थिक आणि ऑपरेशनल बोजा लादला जातो. विशेषतः व्यवसायाच्या प्रारंभिक वाढीच्या टप्प्यात हे अनुपालन खर्च लहान कंपन्यांच्या विस्तारक्षमतेस अडथळा ठरू शकतात, विशेषतः भारतातील स्पर्धात्मक फिनटेक क्षेत्रात. परिणामी, जरी या आराखड्यात दीर्घकालीन फायदे असले तरी ती संसाधन- अभावित कंपन्यांवर अधिक भार टाकते, ज्यामुळे अंमलबजावणीसाठी संतुलित दृष्टिकोनाची आवश्यकता भासते.

पुढील मार्ग

भारताचा फिनटेकमधील AI आणि प्रायव्हसीसाठीचा नियामक दृष्टिकोन इथिकल AI डेव्हलपमेंट प्रॅक्टीसेसना प्रोत्साहित करण्याच्या महत्त्वावर भर देतो. नियामक प्राधिकरण AI डिसीजन मेकिंग प्रक्रियेत पारदर्शकतेला चालना देत आहेत, ज्यामुळे वापरकर्त्यांच्या प्रायव्हसीबद्दलच्या चिंतेत आणि पक्षपातीपण (बायस) किंवा गैर वागुणुकीच्या संभाव्यतेत कमी होईल. AI टूल्स जशी वैयक्तिकृत वित्तीय सेवा जसे की क्रेडिट स्कोअरिंग, फसवणूक शोध, आणि गुंतवणूक सल्ला यांना अधिकाधिक सामर्थ्य प्रदान करत आहेत, तसतसे अनेक AI मॉडेल्सच्या अस्पष्टतेबद्दल चिंता वाढत आहे, जे भेदभाव करण्यास कारणीभूत ठरू शकतात आणि वित्तीय क्षेत्रातील असमानता आणखी वाढवू शकतात.

जसे भारताचे फिनटेक क्षेत्र विकसित होत आहे, तसतसे AI शी संबंधित गोपनीयतेच्या चिंतांचा सामना करण्यामध्ये नियामकांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत आहे. DPDPA सारखा उपक्रम, 'डिझाइनद्वारे प्रायव्हसी' तत्त्वांचा प्रचार, नियामक सॅंडबॉक्सची स्थापना, आणि इथिकल AI डेव्हलपमेंटवर भर देणे हे गोपनीयतेशी संबंधित जोखमींचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहेत. तथापि, तंत्रज्ञान प्रगत होत असताना, नियामकांनी नवीन आव्हाने आणि फिनटेक क्षेत्रातील नवकल्पना यांना तोंड देण्यासाठी आपल्या धोरणांमध्ये सातत्याने सुधारणा करणे आवश्यक आहे.

भारताचा नियामक आराखडा केवळ अनुपालनावर केंद्रित नसून, तंत्रज्ञान प्रगती आणि गोपनीयता संरक्षण यांचे सहअस्तित्व सुनिश्चित करणारी प्रणाली निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. नवकल्पना आणि ग्राहक अधिकार यांच्यात संतुलन साधून, हा आराखडा जबाबदार फिनटेक विकासासाठी एक आदर्श उदाहरण निर्माण करतो. गोपनीयता आणि डेटा संरक्षणासाठी असणाऱ्या भारताच्या दृष्टिकोनातून मिळणारे इंसाईट इतर उदयोन्मुख बाजारपेठांसाठी मौल्यवान धडे ठरू शकतात, ज्यांना अशाच आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

आपला दृष्टिकोन बळकट करण्यासाठी भारताने नियामक, फिनटेक कंपन्या आणि तंत्रज्ञान तज्ञ यांच्यातील आंतरक्षेत्रीय सहकार्य वाढवण्याचा विचार करावा. उदाहरणार्थ, एक विशेष AI आणि फिनटेक टास्क फोर्स स्थापन केल्यास उदयोन्मुख जोखमींची वास्तविक-वेळेत ओळख होऊ शकेल आणि अनुकूल नियामक उपाय तयार करता येतील. याशिवाय, डेटा प्रायव्हसी हक्कांबाबत जनजागृती मोहिमा राबवणे आणि संबंधित भागधारकांमध्ये खुल्या संवादास प्रोत्साहन देणे, हे सुनिश्चित करेल की नियामक आराखडा पारदर्शक, सर्वसमावेशक आणि बदलत्या गरजांना प्रतिसाद देणारा राहील.

## म ह त्वा चे

### अपघातात पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेनवर कि.मी 3 आदई गावाजवळ खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत चार चाकी वाहनाने धडक दिल्याने यात पादचाऱ्याचा मृत्यू झाला. आहे त्याची ओळख पटलेली नाही. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. यातील एनोव्हा कार एम एच 46 बीए 6664 वरील चालक जितेंद्र चिंभा शिंदे (रा.कळंबोली) हे पुणे बाजूकडे जात असताना अचानक एक अज्ञात पादचारी इसम (वय अंदाजे.50, नाव-गाव माहित नाही) पुणे लेन वरून मुंबई लेनकडे रस्ता पार करीत असताना समोर आल्याने कार चालकाचा त्याच्या ताब्यातील वाहनाचा ताबा सुटला. या अज्ञात पादचारी इसमाला दूसरे लेनवर ठोकर लागल्याने पादचारी इसमाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला रस्त्याचे बाजूला घेऊन आयआरबी ॲम्बुलन्सच्या डॉक्टरांनी त्याला तपासून जागेवरच मृत घोषित केले. पादचारी मयत इसमास खाजगी रुग्णवाहिकेने उपजिल्हा रुणालय, पनवेल येथे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

### गंभीर जखमी तरुणाचा मृत्यू

**नवी मुंबई :** नेरूळ येथून उरण येथे जाणाऱ्या महाविद्यालयीन तरुणांची भरधाव स्कुटी डम्परवर धडकल्यामुळे दोन तरुण व एक तरुणी जखमी झाले होते. त्यापैकी गंभीर जखमी असलेला स्कुटीचालक आया नेरेकर (वय १९) याचा रविवारी (ता. १२) सकाळी वाशी येथील एमजीएम रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा अपघात शुक्रवारी (ता. १०) सायंकाळी जासई उड्डाणपुलावर घडला होता. अपघातात मृत झालेला आयान नेरेकर व जखमी असलेला त्याचा मित्र गौतम मृगन (१८) व मैत्रीण श्रुती चौगुले (१९) हे तिघेही नेरूळ येथील एसआयईएस महाविद्यालयात शिक्षण घेत होते. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास हे तिघेही नेरूळ येथून स्कुटीवरून उरण येथे ट्रिपल सीट जात होते. यावेळी त्यांची स्कुटी जासई उड्डाणपुलावर आली असताना आयान नेरेकर याचे भरधाव स्कुटीवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे त्यांची स्कुटी पुढे जाणाऱ्या डम्परवर धडकली होती.

### माणगावची काळ नदी प्रदूषित

**माणगाव:** माणगाव शहरातून बाराही महिने वाहणारी आणि तालुक्यातील वरदायिनी म्हणून ओळख असलेल्या काळ नदीचे पाणी प्रदूषित झाले आहे. या नदीच्या पात्रात कचरा टाकला जात असून, सांडपाणीदेखील सोडण्यात येत आहे, तसेच मातीचा भराव टाकल्यामुळे पाण्यावर लालसर तवंग आलेला आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत नगर पंचायत कार्यालयामध्ये विचारणा केली असता, शहराला जल शुद्धीकरण केंद्रामार्फत स्वच्छ आणि शुद्ध पाणीपुरवठा केला जात आहे. कोणत्याही इमारतीचे सांडपाणी नदीत सोडण्यात आलेले नाही. काळ नदी प्रदूषित करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे सांगण्यात आले.गेल्या काही वर्षांत नदीकिनारी बेकायदा इमारती, बंगले आणि घरे बांधण्यात आलेली आहेत. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार नदी किनाऱ्यापासून १०० मीटर अंतरात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही. तरीही किनाऱ्यालगत बेकायदा बांधकामे सुरूच आहेत. त्यामुळे कचरा आणि मोठ-मोठ्या इमारतीचे सांडपाणी काळ नदीपात्रात बिनदिक्कत सोडण्यात येत आहे.

---

# महाराष्ट्र शांत ठेवण्याचे काम एकट्या मुख्यमंत्र्यांचे नसून ती जबाबदारी सर्वांची!

**साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांचे आग्रही मत**



प्रतिनिधी
■ पुणे

राज्यात परभणी आणि बीडमध्ये घडलेल्या घटनांमुळे काही गावांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण आहे. राज्यात एकी निर्माण व्हायलाच हवी. या ठिकाणी येण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी माझी सविस्तर चर्चा झाली.महाराष्ट्र शांत ठेवण्याचे काम एकट्या मुख्यमंत्र्यांचे नसून ती जबाबदारी सर्वांची आहे. त्याकरिता साहित्यिकांची लेखणी उपयुक्त ठरेल, असे आग्रही मत ज्येष्ठ नेते आणि अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले

सरहद, पुणे व महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांचा साहित्यिकांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.या वेळी माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, मसापचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम आदी या वेळी उपस्थित होते.याप्रसंगी डॉ. मिलिंद जोशी, सदानंद मोरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय नहार यांनी केले. सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी, तर आभार डॉ. वंदना चव्हाण यांनी मानले.

***राजकीय विचार वेगळे ,पण महाराष्ट्र शांत हवा***

*राज्यात एकी निर्माण करणे ही जबाबदारी सर्वांची आहे. हा विचार शेवटच्या माणसापर्यंत जाईल तेव्हाच एकी निर्माण होईल. राजकीय विचार वेगळे असतील, पण महाराष्ट्र शांत झाला पाहिजे. सर्वांनीच राज्यात सामाजिक सलोखा राखला पाहिजे. काही दिवसांपासून राज्यात अतिशय अस्वस्थ करणारी परिस्थिती आहे. राज्यात आजवर आलेल्या संकटांवर मात करण्याची ताकद मराठी माणसात आहे. किल्लारीचा भूकंप, मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्ताराच्या निर्णयावेळी जाती-धर्मांत द्वेष पसरला होता. या संकटाच्या काळात मराठी माणसे एकत्र आल्याचे सर्वांनी पाहिले आहे. दिल्लीत होणाऱ्या साहित्य संमेलनाने मराठी भाषेचा गौरव होणार आहे. दिल्लीतील लोकांना मराठी साहित्य संमेलनाची उत्सुकता आहे. या संमेलनाबद्दल सर्वांना आतुरता आहे.*

---

# लाल महालला आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक बनवणार !

**महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांची घोषणा**



प्रतिनिधी
■ पुणे

''राष्ट्रमाता जिजाऊंचे वास्तव्य असलेला पवित्र लाल महाल पुणे मनपाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे म्हणून प्रयत्न करणार आहे. लालमहाल हे प्रेरणास्थान आहे. त्यामुळे ते चांगले स्मारक करण्यात येईल, असे प्रतिपादन पुणे मनपा आयुक्त राजेंद्र भोसले यांनी केले.मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, आखिल भारतीय शिवमहोत्सव समिती, राजर्षी शाहू महाराज सोशल फाउंडेशन या संघटनांनी राजमाता जिजाऊ साहेब यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या प्रसंगी रत्नप्रभा देशमुख, कमल जाधव, शुभांगी शिवतरे, नर्मदा कोकाटे, इंद्रायणी बालगुडे, संगीता गोळे, सुशीला खेडेकर,मंगल शेवकरी, प्रमिला खांदवे (पाटील), चांगुणाबाई बराटे यांचा आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने अश्विनी नायर यांना कर्तुत्ववान महिला पुरस्कार डॉ. सीमा गायकवाड (कराडे) व कु. छाया काविरे यांना तर राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार स्नेहल शैलेंद्र पाटील यांना प्रदान करण्यात आला.

या वेळी अखिल शिवजयंती महोत्सवाचे अध्यक्ष विकास पासलकर सारथीचे संचालक अशोक काकडे, आमदार बापू पठारे, मराठा सेवा संघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र डूबल, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहर अध्यक्ष दीपक भाऊ मानकर, रणजित शिवतरे, विठ्ठलराव जाधव, मारुतराव सातपुते, ॲड. मिलिंद पवार, दत्ताभाऊ सागरे हनुमंत पवार, विराज तावरे उपस्थित होते.

पुण्याच्या लाल महालात शिवछत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे अनेक वर्षे वास्तव्य होते. याचा महालात शिवरायांनी बलाढ्य मुघल सरदार शायिस्तेखानाची बोटे छुपा हल्ला करून छाटली होती. त्या हल्ल्याच्या धसक्याने शायिस्तेखानाने पुण्यातून पळ काढला होता.शिवाय शिवरायांचा पहिला विवाहही याच लाल महालात झाला होता.त्यामुळे या महालाला मोठे ऐतिहासिक महत्व आहे.

---

# परवडणाऱ्या किंमतीत पत्रकारांना घर उपलब्ध करून द्या, या मागणीला अंनिसचा पाठिंबा - प्रा प्रवीण देशमुख



प्रतिनिधी
■ ठाणे

ठाणे महापालिकेतील पत्रकारांना ज्याप्रमाणे परवडणाऱ्या किमतीत घर उपलब्ध करून दिल्या गेली त्याच पद्धतीने कल्याण डोंबिवलीतील पत्रकारांना सुद्धा शासनाने घर उपलब्ध करून द्यावे अशी मागणी पत्रकार दिनाच्या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार बापू वैद्य यांनी केली त्या मागणीला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारणी सदस्य प्रा प्रवीण देशमुख यांनी जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

प्रेस असोसिएशन कल्याण डोंबिवली यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार दिनाच्या निमित्ताने बापू वैद्य यांनी ही मागणी केली. कल्याण डोंबिवलीतील पत्रकारांच्या घराचा प्रश्न तातडीने सोडवण्याच्या दृष्टीने सर्व ते प्रयत्न केले जातील असे आश्वासन कल्याण ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार राजेश मोरे यांनी दिले. ज्येष्ठ पत्रकार बापू वैद्य यांच्या पाठीशी सर्व पत्रकारांनी उभे राहून आपसातील गट-तट बाजूला सारून हा प्रश्न धसास लावण्याकरिता एकत्रित प्रयत्न केले पाहिजे असेही मत आमदार राजेश मोरे त्यांनी व्यक्त केले.

ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे यांनी पत्रकारांना परवडणाऱ्या किमतीत कशाप्रकारे घरे मिळवून देण्यात आली त्याची माहिती अध्यक्षपदावरून बोलताना सर्वांसमोर सविस्तरपणे मांडली.प्रेस असोसिएशन कल्याण-डोंबिवली यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार दिनाच्या कार्यक्रमाला कल्याण डोंबिवलीतील अनेक पत्रकार आवर्जून उपस्थित होते. त्याचबरोबर पुरोगामी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारणी सदस्य प्रवीण देशमुख यांनीही सर्व पत्रकारांशी संवाद साधत पत्रकारांच्या मागणीला आपला जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्र ट्रस्टचे विश्वस्त गणेश चिंचोले यांनी अंनिसची भूमिका अगदी थोडक्यात मांडली. या निमित्ताने नवनिर्वाचित आमदार राजेश मोरे, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे नगरसेवक महेश पाटील, ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे, कल्याण डोंबिवली महापालिकेचे सहायक आयुक्त राजेश सावंत, हेमा मुंबरकर सहाय्यक आयुक्त फ प्रभाग, माधवी पोफळे जनसंपर्क अधिकारी यांच्यासह अनेकांना डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे 'प्रश्न तुमचा उत्तर दाभोळकरांचे' हे पुस्तक सप्रेम भेट दिले.

---

## अनधिकृत बॅनर, पोस्टर्सवर कारवाई

**कल्याण :** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कल्याण-डोंबिवली महापालिका परिसरात अनधिकृत बॅनर, पोस्टर्स, झेंडे आणि होर्डिंगवर कारवाईचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिले होते. त्या अनुषंगाने डिसेंबरमध्ये १,०८५ पोस्टर्स, २,८६७ बॅनर्स, १९ होर्डिंग, २४६, झेंडे काढण्यात आले आहेत. तात्पुरत्या स्वरूपात बॅनर लावण्यासाठी परवानगीचे अधिकार संबंधित प्रभागाचे सहाय्यक आयुक्तांना देण्यात आले आहेत. जानेवारीपासून अनधिकृत बॅनर लावणाऱ्या २७ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. यापुढेही अनधिकृत बॅनर्स काढण्याच्या कार्यवाहीची मोहीम सुरू राहणार. तरी नागरिकांनी आणि राजकीय पक्षां महापालिका परिक्षेत्रात तात्पुरत्या स्वरूपात बॅनर लावण्यासाठी संबंधित प्रभागक्षेत्र कार्यालयाकडून परवानगी घेण्यात यावी, असे आवाहन अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधूत तावडे यांनी केले आहे.

---

## अंबरनाथ नगरपरिषदेची राज्य महामार्गावरील फेरीवाल्यांवर कारवाई



प्रतिनिधी
■ अंबरनाथ

कल्याण बदलापूर रस्त्यावर फेरीवाले आपले दुकान मांडून मोठ्याप्रमाणात अतिक्रमण करत होते. कोणत्याही प्रकारची परवानगी यांनी घेतलेली नाही त्यामुळे अंबरनाथ पालिकेने कार्यवाही करून रस्ता मोकळा केला.महामार्ग असल्याने या रस्त्यावर वाहतुक वर्दळ मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे वाहतूक कोंडी होण्याची व अपघात होण्याची शक्यता होती त्यामुळे आता कारवाईनंतर महामार्गाने मोकळा श्वास घेतला असून यापुढे जर राज्य महामार्गावर अतिक्रमण केल्यास कारवाई करण्याचा पालिकेने इशारा देण्यात आला आहे.

---

## जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनी महापालिकेतर्फे अभिवादन !



प्रतिनिधी
■ कल्याण

जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या समयी उपस्थित माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, उपअभियंता श्याम सोनवणे तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील त्यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले.

तद्नंतर पारनाका, कल्याण (पश्चिम) येथे असलेल्या स्वामी विवेकानंद यांच्या पुतळयास उपायुक्त संजय जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यासमयी सौरभ कुळकर्णी, शंभू पंडित, सारंग केळकर , प्रवीण शहाणे , मिलिंद रेडे, संदीप पळणीटकर व इतर नागरिक उपस्थित होते.

डोंबिवली येथील महापालिकेच्या जुन्या विभागीय कार्यालयाजवळील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळयास फ प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी डोंबिवली विभागीय कार्यालयातील इतर कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

---

## अंबरनाथ पालिकेतील 62 कर्मचाऱ्यांच्या बदल्या

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

अनेक वर्षांपासून तीच माणसं एकाच विभागात काम करत असल्याने ते त्या विभागाचे प्रमुख बनून भ्रष्टाचार करत असल्याचे दिसत होते याची तक्रार करून सुध्दा काही हालचाल होत नव्हती त्यामुळे अखेर अंबरनाथ नगरपालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असलेल्या ६२ कर्मचाऱ्यांची विभागाअंतर्गत बदली करण्यात आली आहे. यातील अतिक्रमण विभागातील सर्वच्या सर्व २० कर्मचाऱ्यांची उचलबांगडी करण्यात आली आहे. यापैकी १० कर्मचाऱ्यांची आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून बदली करण्यात आली आहे.

अंबरनाथ पालिकेच्या खातेप्रमुखांची खाती महिनाभरापूर्वी बदलण्यात आली होती. त्यानंतर वर्षानुवर्षे एकाच विभागात असलेल्या कर्मचाऱ्यांची बदली होणार असल्याची चर्चा होती. विशेषतः अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांची बदली होत नसल्याने अंबरनाथ नगरपरिषद इतर कर्मचाऱ्यांत नाराजी होती. आता अतिक्रमणविरोधी पथकातील सर्वच्या सर्व २० कर्मचाऱ्यांची अन्य विभागांत बदली करण्यात आली आहे. सफाई कामगार या मूळ पदावर कार्यरत असलेल्या अतिक्रमण विभागातील १०, कर विभागातील ४, नगररचना आणि लेखा विभागातील प्रत्येकी एका कर्मचाऱ्याची थेट आरोग्य विभागात बदली करण्यात आली आहे.

---

## क्रांतीपुरुष पुरुषोत्तम खेडेकर यांचा अमृतमहोत्सव अभिष्टचिंतन सोहळा पुणे येथे संपन्न



प्रतिनिधी
■ पुणे

नुकताच बालगंधर्व नाट्यगृह पुणे येथे मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष युगपुरुष, क्रांतीपुरुष पुरुषोत्तम खेडेकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा हजारो अनुयायासमवेत सम्पन्न झाला.

सदर सोहळ्यास देशाचे रस्ते व वाहतूक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती होती. मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष विजय घोगरे, प्रदेश कार्याध्यक्ष नवनाथ घाटगे,३३ कक्षाचे प्रदेश अध्यक्ष, राज्य व राष्ट्रीय अध्यक्ष आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. खेडेकरांना पालघर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील प्रसिद्ध वारली चित्रकला फ्रेम भेट शुभेच्छा म्हणून खेडेकरांना दिली.

त्या प्रसंगी खालील पदाधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय अध्यक्ष आपले मार्गदर्शक नितिन मोकाशी, सुनिल (नाना) अहिरे, तेजस भोईर जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रेगेड, मराठा सेवा संघ जिल्ह्याध्यक्ष: नागनाथ रामनबैनवाड .सदर प्रसंगी त्यांना शुभेच्छा दिल्या.

---

## पडघ्यात अखंड हरिनाम सप्ताह

**पडघा :** वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे विविध आध्यात्मिक कार्यक्रमाद्वारे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. पडघ्यातील वारकरी सांप्रदाय मंडळाच्या वतीने १३ ते २० जानेवारीपर्यंत विठ्ठल-रुक्मिणी मंदिर पटांगण येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन केले असून दररोज सकाळी काकड आरती, प्रभातफेरी, सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी नामस्मरण, महिला भजन, सायंकाळी शिवपुराण कथा, सामुदायिक हरिपाठ, व रात्री नामवंत महाराजांचे कीर्तन असे भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

---

## बौद्धविकास मंडळ महाबळेश्वरच्या अध्यक्षपदी आयु. प्रकाश कांबळे

प्रतिनिधी
■ महाबळेश्वर

बौद्धविकास मंडळ ,महाबळेश्वर या मंडळाची नवीन कार्यकारिणी निवड मंडळाचे अध्यक्ष आयु. प्रकाश कांबळे यांच्या अध्यक्षते खाली आणि माजी अध्यक्ष आदरणीय आयु. के आर कदम यांच्या मार्गदर्शनाने आणि सर्व समाज बांधव यांच्या सहमतीने जाहीर झाली आहे.संघटनेच्या अध्यक्षपदी अध्यक्ष आयु. चंद्रकांत कांबळे (आवळण ) ,उपाध्यक्षपदी आयु. विजय कदम ( खरोशी ), आयु. कामेश गमरे (वेळापुर ) तर कार्याध्यक्षपदी आयु विजय कदम (खरोशी ) यांची बिनविरोध निवड झाली.

संस्थेच्या उपाध्यक्षपदी आयु. विजय कदम ( खरोशी ), उपाध्यक्ष: आयु. कामेश गमरे (वेळापुर ), जनरल सेक्रेटरीपदी आयु. सुमित कदम (खरोशी ),सेक्रेटरीपदी राजेश कदम( रुळे ), राजेश कदम ( रुळे ),चंद्रकांत यादव (दुधगाव ), राजेश तांबे (वाळणे ),विजय साळुंखे ( आरव ),कोषाध्यक्षपदी तानाजी कदम (रुळे ),तर उप-कोषध्यक्षपदी रवींद्र सपकाळ (देवळी ) यांची निवड करण्यात आली. मुख्य हिशोब तपासणीस: प्रज्योत कदम (रेणोशी ) यांची तर सह हिशोब तपासणीसपदी .सचिन कांबळे (कासरूड ) यांची निवड करण्यात आली.

---

## महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय पुरस्कार



प्रतिनिधी
■ बेळगाव

शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या नाविन्यपूर्ण योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल महावितरण आणि एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनीला शनिवारी बेळगाव येथे आयपीपीएआय पुरस्कार सोहळयात राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचसोबत सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध वर्गवारीतील एकूण आठ पुरस्कार देऊन महावितरणचा सन्मान करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा गौरव झाल्याबद्दल महावितरणचे आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या नेतृत्वाखालील एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनीचे अभिनंदन केले. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी मा. मुख्यमंत्र्यांचे आभार मानले असून कंपनीच्या गौरवाबद्दल महावितरणचे वीज ग्राहक तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले.

सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व त्या आधारे कृषी फीडर्स चालवून शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा करायचा अशी नाविन्यपूर्ण मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० महावितरणतर्फे राज्य सरकारचा ऊर्जा विभाग व एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनीच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अंमलात येणारी ही योजना शेतकऱ्यांना लाभदायक ठरण्यासोबत उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करणारी आणि एकंदरितच ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन करणारी आहे. या योजनेमुळे कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणला शनिवारच्या सोहळयात दोन पुरस्कार देण्यात आले.

महावितरणचे प्रशिक्षण विभागाचे प्रमुख मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रय बनसोडे, वितरण विभागाचे अधीक्षक अभियंता अमित बोकील, विशेष प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता शरद बंड, उपकार्यकारी अभियंता आरती कुलकर्णी व सामग्री विभागाचे कार्यकारी अभियंता रमेश देठे यांनी कंपनीतर्फे पुरस्कार स्वीकारले.

ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या गटात असाधारण कामगिरी करणारी विद्युत वितरण कंपनी म्हणून महावितरणची निवड करण्यात आली. विद्युत वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्याच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाची कंपनी म्हणून महावितरणला पुरस्कार देण्यात आला. बड्या विद्युत वितरण कंपन्यांच्या गटात पहिल्या तीन सर्वोत्कृष्ट कंपन्यांमध्ये महावितरणचा समावेश झाला.महावितरणला माहिती तंत्रज्ञानाचा कल्पक वापर करण्याबद्दल, विकेंद्रीत स्वरुपात बॅटरी स्टोरेज सिस्टिम विकसित करण्याबद्दल आणि प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल असे आणखी तीन पुरस्कार प्राप्त झाले.

मराठी अक्रॉस मुंबई




# सनातन धर्म के ध्वज वाहक अखाड़ों के बाद महाकुम्भ क्षेत्र में दिखा शंकराचार्यों के छावनी प्रवेश का भव्य वैभव







- ज्योतिष्पीठ के शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती की प्रवेश मंगलम यात्रा के दर्शन के लिए उमड़ा जन आस्था का सैलाब
- गौ माता को राष्ट्र माता घोषित करने के अभियान को समर्पित रहा छावनी प्रवेश
- प्रवेश यात्रा में दिखी सम्पूर्ण भारत की संस्कृति की झलक

(एजेंसी)।

**महाकुम्भ नगर।** संगम तीरे बसे महाकुम्भ नगर में सनातन धर्म की सभी धाराओं और सम्प्रदाय का संगम हो रहा है। सनातन के ध्वज वाहक अखाड़ों के बाद अब शंकराचार्यों का प्रवेश भी महाकुम्भ नगर में हो गया है। कुम्भ क्षेत्र में ज्योतिष्पीठ के शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती जी की प्रवेश यात्रा निकाली गई जिसमें हजारों संतो ने हिस्सा लिया।

### प्रवेश मंगलम यात्रा के साथ शंकराचार्य का भी कुंभ क्षेत्र में हुआ प्रवेश...

